



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १९६ * नांदेड * शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## पेपरफुटी प्रकरण : फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करणार -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील युवकांचे हित आणि त्यांचे भविष्य ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. पेपर लीकच्या सर्व प्रकरणांमध्ये दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा देण्यासाठी आणि खटल्यांचा त्वरित निकालासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट्सची स्थापना करण्यात येईल. यासंबंधी संबंधित विभागांनी आवश्यक कारवाई सुनिश्चित करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती नरेंद्र मोदी म्हणाले.

तसेच विद्यार्थ्यांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी सरकार घेत असलेल्या निर्णयांमध्ये हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. युवकांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला माफ केले जाणार नाही, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

गेल्या ३४ दिवसांपासून नीट पेपर फुटीवरुन जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरुच आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सरकारसोबत विद्यार्थ्यांची अजून तरी यशस्वी चर्चा झाली नाही. याच दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी एक्सवर पोस्ट करत कॉंकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावर भाष्य केलं आहे.

दिल्लीतील जंतरमंतरवरील कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाची, गेल्या ३४ दिवसांपासून नीट पेपर फुटीवरुन जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरुच आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सरकारसोबत विद्यार्थ्यांची अजून तरी चर्चा झाली नाही. तर विद्यार्थी आंदोलनावर ठाम आहेत. त्यामुळे आंदोलनाची कोंडी कधी फुटते हे पाहावं लागेल.

सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा गुरूवारी २६ वा दिवस होता. ते गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयात आहेत. तर सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडण्याची सशर्त तयारी दर्शवली आहे. सरकारला पत्र लिहून त्यांनी आपल्या मागण्या सादर केल्या आहेत. तर आंदोलकांवर दंड ठोठावणार नाही अशी हमी द्या, सरकारने हमी दिली तर उपोषण थांबवतो असं वांगचुक म्हणाले. सरकारनं हमी न दिल्यास उपोषण थांबवणार नाही असा इशाराही त्यांनी दिलाय. आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना भरपाई, संसदेत चर्चा करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेण्यावर विचार व्हावा, आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर कोणतीही कारवाई होऊ नये, या वांगचुक यांच्या मागण्या आहेत.

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापर्यंत माघार नाहीच -अभिजीत दिपके

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्लीतील जंतर मंतरवर कॉकरोच जनता पक्षाचे आंदोलन सुरूच आहे. आजही हजारोंचा जमाव आहे. जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिला आहे.

पुढे ते म्हणाले की, जंतर मंतरवर महिनाभरापासून आंदोलन सुरू आहे, पण अशी कोणतीही घटना घडली नाही. आता दगडफेकीद्वारे आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पोलीस स्वतःच तिथे दगडांनी भरलेले ट्रक आणत आहेत. आज आमच्या आंदोलनाचा ३४ वा दिवस आणि सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा २६ वा दिवस आहे. आमचे आंदोलन असेच सुरू राहील आणि जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आम्ही ते मागे घेणार नाही. दरम्यान, दीपके यांनी सोनम वांगचुक यांना उपोषण संपवण्याचे आवाहन केले.

दिल्लीतील जंतर मंतरजवळ विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये गुरूवारी रात्री पुन्हा संघर्ष झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, कनॉट प्लेसमधील टॉल्स्टॉय मार्गाजवळ काही आंदोलकांनी पोलिसांवर दगड आणि बाटल्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात कनॉट प्लेसचे एसीपी विवेक भगत जखमी झाले. प्रत्युत्तरात पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले असून, त्यात आंदोलक काठ्या घेऊन पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ला करताना दिसत आहेत. हा संघर्ष सुमारे १५ मिनिटे चालला, पण त्यानंतर परिस्थिती सामान्य झाली आहे.

## आसाममध्ये पुराचा हाहाकार; २४ तासांत १० जणांचा मृत्यू

**दिसपूर (प्रतिनिधी)–** आसाममध्ये पावसाचा जोर ओसरण्याचे नाव घेत नसून पुराचे संकट दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहे. राज्यातील ११ जिल्हे सध्या या भीषण पुराच्या विळख्यात सापडले असून तब्बल ६.५ लाखांपेक्षा जास्त नागरिक यामुळे बाधित झाले आहेत. गेल्या २४ तासांत पुरामुळे आणखी १० जणांचा मृत्यू झाला असून, यामुळे या वर्षात आसाममध्ये पुरामुळे प्राण गमावलेल्यांची एकूण संख्या आता ४१ वर पोहोचली आहे.

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत शिवसागर आणि जोरहाट जिल्ह्यांत प्रत्येकी ३ जणांचा पुरामुळे मृत्यू झाला आहे. याशिवाय चराईदेव जिल्ह्यात २, तर कर्बी आंगलोंग आणि धेमाजी जिल्ह्यांत प्रत्येकी एका व्यक्तीला आपला जीव गमवावा लागला आहे. सध्या शिवसागर जिल्ह्याला पुराचा सर्वाधिक फटका बसला असून येथे सुमारे ४ लाख लोक बाधित झाले आहेत.

## मुंबईत ठाकरे बंधूंचा रविवारी शिवाजी पार्क ते सिद्धीविनायक मंदिरादरम्यान तिरंगा मोर्चा



**मुंबई (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी प्रकरण आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीसह देशातील अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांची आंदोलने सुरू आहेत. दिल्लीतील आंदोलनावर लाठीचार्ज झाल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला राजकीय पक्षांनी पाठिंब्याचे बळ दिले. त्यानंतर आता मुंबईत शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांनी मोर्चाची हाक दिली आहे. येत्या २६ जुलै रोजी, रविवारी मुंबईत मोर्चा निघणार आहे.

मुंबई महापालिका निवडणूक निकालानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी गुरूवारी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी मोर्चाची घोषणा करण्यात आली. छत्रपती शिवाजी उद्यान ते सिद्धीविनायक मंदिरापर्यंत मोर्चा काढण्यात येणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले.

राज ठाकरे यांनी म्हटले की, ज्या पद्धतीने आंदोलन दडपली जात आहे. त्यासाठी काय काय केलेल्या आहे आपण पाहिले. काँग्रेसच्या काळात, रझा अकादमीच्या मोर्चात आम्ही अरूप पटनायक यांचा राजीनामा मागितला होता. त्यानंतर २६/११ दहशतवादी हल्ल्यानंतर आर. आर. पाटील यांना गृहमंत्री पदावरून पायउतार व्हावे लागले. तर, राजीनामा मागणे काही नवे नाहीं हे काही पहिल्यांदा घडले नव्हते असे राज यांनी म्हटले.

## सीजेपीकडून आज देशव्यापी आंदोलनाची घोषणा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी आणि देशातील शिक्षणाचा दर्जा सुधारला जावा यासाठी कॉकरोच जनता पार्टीकडून राजधानी नवी दिल्लीत जंतर मंतरवर आंदोलन करण्यात येत आहे. कॉकरोच जनता पार्टी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम आहे. सीजेपीच्या २० जुलैच्या मोर्चावर पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला होता. त्या विरोधात कॉकरोच जनता पार्टीनं २४ जुलै रोजी देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन शांततापूर्ण मार्गानं करण्यात यावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

सीजेपीनं आज दि. २४ जुलै रोजी देशभरात होणारं आंदोलन प्रत्येक जिल्ह्यात व्हावं, संपूर्ण देशभरात एकाच वेळी आंदोलन करण्यात यावं, असं आवाहन केलं आहे. देशभरातील विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांनी या सगळ्यात सहभागी व्हावं, असं आवाहन सीजेपीनं केलं आहे. या आंदोलनासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घ्याव्यात, असंही सांगण्यात आलं आहे. सर्व जण एकत्र आल्यानंतर सर्व संघटनांनी सीजेपीकडून करण्यात आलेल्या चार मागण्या सर्वांना वाचून दाखवाव्यात असं सांगण्यात आलं आहे.

आंदोलनस्थळी इन्कलाब जिंदाबाद आणि भारत माता की जय अशा घोषणा द्याव्यात, असं सीजेपीकडून सांगण्यात आलं आहे. सीजेपीनं चार प्रमुख मागण्या केल्या होत्या, त्यामध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जावा, आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना सरकारनं एक कोटी रुपयांची नुकसान भरपाई दिली जावी. विद्यार्थी आंदोलकांवर गुन्हे दाखल करु नये. दिल्लीत विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर कारवाई व्हावी, अशी मागणी सीजेपी केलेली आहे.

## पुढील पाच दिवस नांदेडसह राज्यातील ८ जिल्हे कोरडेठाक राहण्याचा अंदाज

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात पुन्हा एकदा मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. यंदा मान्सून आधीच एक महिना उशिरा आला. त्यात जुलै महिन्यात म्हणावा तसा पाऊस झाला नाही. ऊन पावसाचा खेळ सुरू होता. आता उत्तरेकडे दोन सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाले आहेत. त्यामुळे नांदेड जिल्ह्यासह राज्यातील ८ जिल्ह्यात आणखी पावसाची प्रतिक्षा असणार आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशीव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा कोणताही अलर्ट सध्यातरी देण्यात आलेला नाही. काही ठिकाणी तुरळ किंवा रिमझिम पाऊस राहणार आहे. यावेळी मराठवाड्यात ८० टक्केच मान्सूनचा पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाकडून देण्यात आला होता. मात्र तेवढाही पाऊस पडेल की नाही अशी शंका आता येऊ लागली आहे. महाराष्ट्रात २१ जुलैपासून बऱ्याच भागांमध्ये अति मुसळधार ते मुसळधार पाऊस सुरू आहे. मात्र मराठवाड्यात अजूनही अति मुसळधार पाऊस म्हणावा तसा झालेला नाही.

## प्रणिता चिखलीकर यांच्याकडे भाजप महिला मोर्चा महामंत्री पदाची जबाबदारी

### प्रदेश उपाध्यक्षपदी आ. प्रज्ञा सातव, संध्या राठोड; सचिवपदी पद्मा गिन्हे, महादेवी मठपती





**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या प्रदेश महामंत्री पदी लोहा-कंधारचे विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कन्या प्रणितााताई चिखलीकर (देवरे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तर २७ प्रदेश उपाध्यक्षांमध्ये कळमनुरी येथील आ. प्रज्ञाताई सातव त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील संध्या राठोड यांची तर ५५ प्रदेश सचिवांमध्ये नांदेडच्या पद्मा गिन्हे आणि महादेवी मठपती यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्या शिफारशीनुसार प्रदेश पदाधिकाऱ्यांची ही नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून ८ महिलांची प्रदेश महामंत्री पदी निवड करण्यात आली आहे.

## खोट्या ड्रग्स केसमध्ये आंदोलकांना अडकवण्याची धमकी देणाऱ्या पोलिसावर कारवाई होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** खोट्या ड्रग्स केसमध्ये आंदोलकांना अडकवण्याची धमकी देणाऱ्या पोलिसावर कारवाई होणार आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल माध्यमावर वायरल झाला आहे.

नवी दिल्लीतील जंतर मंतर इथं सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना एका पोलीस कर्मचाऱ्याने धमकी दिल्याचा धक्कादायक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. पुन्हा या परिसरात दिसला तर माझ्यासारखा बेकार माणूस नाही. मी तुमच्या खिशात ५०-५० ग्रॅम पावडर टाकेन. त्यानंतर मग जामीनही मिळणार नाही, अशी धमकी सदर पोलीस कर्मचाऱ्याने विद्यार्थ्यांना दिल्याचं व्हायरल व्हिडिओत दिसत आहे. या व्हिडिओवरून पोलिसांच्या गजब कारभाराचे वाभाडे काढले जाऊ लागल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी अखेर प्रतिक्रिया देत सदर पोलीस कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आल्याचं सांगितलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विद्यार्थी आंदोलनाबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी त्यांना मुंबई पोलिसांच्या वादग्रस्त व्हिडिओविषयी विचारलं असता ते म्हणाले की, एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओची पुष्टी केली जात आहे. मात्र चौकशी सुरू असताना त्या पोलिसावर कारवाई करण्यात आली आहे. त्याला पोलीस स्टेशनमधून काढण्यात आलं आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली आहे.

## दिल्ली लाठीमाराच्या निषेधार्थ नांदेड बंदला संमिश्र प्रतिसाद








**नांदेड (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी प्रकरणाची तत्काळ चौकशी करावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी दिल्ली येथील जंतर-मंतर मैदानावर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलीसांनी बेछूट लाठीमार केला. या घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने गुरुवारी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला नांदेडमध्ये संमिश्र प्रतिसाद मिळाला. या बंदमध्ये कॉंग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व अन्य पक्षांच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

नीट पेपरफुटी प्रकरणाची चौकशी करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या व अन्य मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केले आहे. दि.२० जुलै रोजी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. या लाठीमारात असंख्य विद्यार्थी जखमी झाले असून या घटनेचे पडसाद देशभरात उमटत आहेत. विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते. बंदचे पडसाद गुरुवार सकाळपासूनच शहरात उमटू लागले होते. शहरातील खाजगी कोचिंग क्लासेस पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. शहरातील आयटीआय चौकापासून वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी तरोडा नाक्यापर्यंत रॅली काढली. रॅलीतील कार्यकर्ते व्यापाऱ्यांना दुकाने बंद करण्याचे आवाहन करीत होते. तरोडा नाका येथील शेतकरी पुतळ्यापासून मोर्चाला प्रारंभ झाला. या मोर्चात कॉंग्रेस, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट, पीपल्स रिपब्लिकन पार्टीसह अन्य पक्षांचे कार्यकर्ते, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शहरात कायदा व सुव्यवस्था बाधित होणार नाही याची दक्षता पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी घेत स्वतः रस्त्यावर उतरून आपल्या अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक वैभव पडवळ, पोलीस निरीक्षक संतोष तांबे, राजेश पुरी, अजित कुंभार, मारोती मुंडे आदींनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

या बंदमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या नेते-कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, भुजंग पाटील, महानगरप्रमुख प्रकाश मारावार, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले, प्रा. राजू सोनसळे, राक्षसमारे, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, अब्दुल गफार, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे बापूराव गजभारे, सुनील कदम, छावाचे जिल्हा अध्यक्ष दशरथ कपाटे, सुरेश हाटकर यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी आणि महिला आदींनी सहभाग घेतला होता.



## शेतकऱ्यांची फसवणूक: नांदेडमध्ये ६ बियाणे कंपन्यांवर गुन्हे

### अप्रमाणित सोयाबीन बियाणे प्रकरण; जिल्हा प्रशासनाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** खरीप हंगाम २०२६ मध्ये सोयाबीन बियाण्यांची उगवण न झाल्याच्या तक्रारी आणि प्रयोगशाळेत अप्रमाणित आढळलेल्या नमुन्यांच्या आधारे नांदेड जिल्हा प्रशासनाने ६ बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपन्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

खरीप हंगामासाठी जिल्ह्यात ४ लाख ५६ हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पेरणीचे नियोजन आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळावे यासाठी जिल्ह्यातील बियाणे निरीक्षकांनी ७५१ सोयाबीन बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले होते.

प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या अप्रमाणित नमुन्यांच्या अहवालांसह, बियाणे उगवण न झाल्याबाबत प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीमार्फत पाहणी करण्यात आली. पाहणीत बियाण्यात दोष आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली.

संबंधित कंपन्यांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५, बियाणे कायदा १९६६ चे कलम ६, ७, १९, २१, बियाणे नियम १९६८ चा नियम २३ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(२) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

यामध्ये बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रा. लि., गेवराई बाजार, ता. बदनापूर, जि. जालना, पार्श्व जेनेटिक्स इंडिया, पेटलावाड, जि. झाबुआ (मध्य प्रदेश), रवी सीड्स अँड रिसर्च प्रा. लि., इंदौर (मध्य प्रदेश), एस.के.बी. सीड्स प्रा. लि., जानकी नगर, इंदौर (मध्य प्रदेश), एशियन सीड्स प्रा. लि., इंदौर (मध्य प्रदेश) आणि दप्तरी ग्रो प्रा. लि., ता. सेलू, जि. वर्धा या कंपन्यांचा समावेश आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे कृषी अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवाडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

सदरची कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, कृषी संचालक (निरीक्षण व गुणवत्ता नियंत्रण) बोरकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यासाठी मोहीम अधिकारी सचिन कपाळे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अमोल पेकम आणि संबंधित तालुका बियाणे निरीक्षकांनी सहकार्य केले.

## एखाद्या मंत्र्याचा राजीनामा घेतल्याने सरकारची सत्ता जाणार नाही

### अण्णा हजारेंचे पीएम मोदींना खरमरीत पत्र

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नवी दिल्लीसह देशातील विविध शहरांमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. लोकशाहीत जनतेचा आवाज दडपून नव्हे, तर संवादातून प्रश्न सोडविण्याबाबत असा या पत्राचा विषय असून, आंदोलनादरम्यान घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अण्णा हजारेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, नवी दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काल घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक आहेत. लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारच्या घटना घडणे कोणाच्याही हिताचे नाही. कोणत्याही परिस्थितीत हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा अनावश्यक बळाचा वापर टाळला गेला पाहिजे, असे माझे ठाम मत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# पाकिस्तानच्या विघटनाची नांदी?

## बलुचिस्तान स्वतंत्र राष्ट्र

पाकिस्तानने भारताच्या विरोधात अनेक दशकांपासून अवलंबलेले धोरण जगजाहीर आहे. काश्मीरपासून पंजाबपर्यंत, मुंबईपासून पठाणकोटपर्यंत भारताला अस्थिर करण्याचे असंख्य प्रयत्न पाकिस्तानने केले. मात्र भारताची लोकशाही अधिक मजबूत होत गेली. पाकिस्तान मात्र आर्थिक, राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या ढासळत गेला. आज परिस्थिती अशी आहे की, भारताचे तुकडे करण्याचे स्वप्ने पाहणारा पाकिस्तान स्वतःच विघटनाच्या उंबरठ्यावर उभा आहे. बलुचिस्तानमधून समोर येणाऱ्या घडामोडी या पाकिस्तानसाठी अत्यंत गंभीर इशारा आहेत. सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या एका घोषणापत्रात बलुचिस्तानने स्वतःला स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषित केल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यात स्वतंत्र ध्वज, राष्ट्रगीत, चलन, प्रशासकीय व्यवस्था आणि नैसर्गिक संसाधनांवरील स्वामित्व जाहीर करण्यात आले आहे. या दाव्यांची स्वतंत्र पुष्टी झालेली नसली तरी बलुचिस्तानातील असंतोष, सशस्त्र संघर्ष आणि पाकिस्तानविरोधी भावना या अनेक वर्षांपासून वास्तव आहेत. त्यामुळे या घडामोडी केवळ अफवा म्हणून दुर्लक्षित करता येणार नाहीत. पाकिस्तानच्या एकूण भूभागापैकी सुमारे ४४ टक्के क्षेत्र व्यापणारा बलुचिस्तान हा नैसर्गिक वायू, सोने, तांबे, कोळसा आणि इतर खनिज संपत्तीने समृद्ध प्रदेश आहे. परंतु या संपत्तीचा लाभ स्थानिक जनतेपर्यंत पोहोचला नाही. उलट, बलुचिस्तानच्या संसाधनांवर पंजाबकेंद्री सत्तेने नियंत्रण ठेवून विकासाचा मोठा हिस्सा इतर भागांकडे वळविला. परिणामी, विकासापासून वंचित राहिलेल्या बलुच समाजात असंतोष वाढत गेला. या असंतोषाला उत्तर देण्याऐवजी पाकिस्तानने लष्करी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला. नवाब अकबर बुग्टी यांची हत्या, हजारो नागरिकांचे बेपत्ता होणे आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यामुळे स्वातंत्र्याची मागणी अधिक तीव्र झाली. चीन-पाकिस्तान आर्थिक महामार्ग आणि ग्वादार बंदराचा विकास हा पाकिस्तानसाठी आर्थिक जीवनरेषा मानला जातो. मात्र बलुच जनतेला वाटते की, या प्रकल्पांमुळे स्थानिकांना रोजगार किंवा विकास मिळण्याऐवजी बाहेरील लोकांचे वर्चस्व वाढेल आणि त्यांच्या संसाधनांवरच त्यांचा हक्क कमी होईल. त्यामुळे बलुचिस्तान लिबरेशन आर्मी आणि इतर संघटनांनी या प्रकल्पांना सातत्याने विरोध केला आहे. चीनलाही या अस्थिरतेमुळे मोठा आर्थिक आणि सामरिक धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानसमोर केवळ बलुचिस्तानच नव्हे, तर आणखी दोन प्रांतांतील असंतोषही मोठे आव्हान ठरू शकतो. सिंध प्रांतात सिंधी राष्ट्रवादाची भावना सातत्याने डोके वर काढत आहे. कराचीसारख्या आर्थिक राजधानीवर केंद्राचे आणि पंजाबच्या वर्चस्वाचे राजकारण असल्याची भावना तेथील अनेक गटांत आहे. दुसरीकडे खैबर पख्तूनख्वामध्ये पश्तून ओळख, सीमा भागातील दहशतवाद आणि केंद्र सरकारच्या धोरणांविरोधातील नाराजी वाढत आहे. पश्तून तहफ्फुज चळवळीसारख्या संघटनांनी वारंवार मानवी हक्कांचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यामुळे भविष्यात पाकिस्तानमध्ये प्रादेशिक स्वायत्ततेच्या किंवा स्वतंत्रतेच्या मागण्या अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. इतिहासाचा एक कठोर नियम आहे की, जो देश दुसऱ्यांच्या सार्वभौमत्वाला तडा देण्याचा प्रयत्न करतो, त्याला स्वतःच्या एकात्मतेची किंमत चुकवावी लागू शकते. १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तान तुटून बांगलादेश निर्माण झाला. त्यानंतरही पाकिस्तानने आत्मपरीक्षण करण्याऐवजी भारतविरोधी दहशतवादाला खतपाणी घातले. परिणामी देशाची अर्थव्यवस्था कोलमडली, आंतरराष्ट्रीय विश्वासार्हता कमी झाली आणि अंतर्गत प्रादेशिक असंतोष अधिक तीव्र होत गेला. तथापि, बलुचिस्तानच्या स्वतंत्र राष्ट्राच्या दाव्यांकडे पाहताना संयम आणि वस्तुनिष्ठता आवश्यक आहे. अशा दाव्यांची अधिकृत आणि स्वतंत्र पुष्टी होणे महत्त्वाचे आहे. परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे की, बलुचिस्तानातील जनतेचा दीर्घकालीन असंतोष, लष्करी दडपशाही आणि संसाधनांच्या अन्याय्य वाटपामुळे पाकिस्तानसमोर अस्तित्वाचे मोठे संकट उभे राहिले आहे. भारतासाठी या घडामोडी सूडाचा विषय नसून एक धडा आहेत. विविधतेचा आदर, लोकशाही, संघराज्य व्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास यामुळेच भारताची एकात्मता अधिक मजबूत झाली आहे. त्याउलट दडपशाही, दहशतवादाचे पोषण आणि प्रादेशिक असमानता यांवर उभा राहिलेला पाकिस्तान आज स्वतःच्या धोरणांची किंमत चुकवत आहे. बलुचिस्तान हे त्या कर्माचे पहिले फळ ठरले, तर सिंध आणि खैबर पख्तूनख्वामधील वाढता असंतोष पाकिस्तानच्या भविष्यातील आणखी मोठ्या राजकीय विघटनाची नांदी ठरू शकतो. इतिहास सांगतो की, बंदुकीच्या जोरावर राष्ट्रे फार काळ एकसंध राहत नाहीत; न्याय, विकास आणि विश्वास यांच्यावरच त्यांचे भवितव्य उभे राहते.

# युवाशक्तीला विचारांची व मनोनिग्रहाची जोड मिळाल्यास राष्ट्राचे भविष्य उज्ज्वल



मानवी शरीर निसर्गाचा एक अद्भूत चमत्कार आहे. आपल्या जीवन प्रवासात शरीर आणि आपली इंद्रिये ही अत्यंत महत्वाची संपत्ती आहे. ज्या संपत्तीचे मूल्य कधीही पैशात मोजता येणार नाही. सर्व प्रगतीचा तो आरंभबिंदू आहे. या संपत्तीशिवाय होणारी प्रगती मनुष्याला निखळ सुखापर्यंत नेऊ शकत नाही. मनुष्य जीवनाचे अंतिम ध्येय हे निखळ आणि निरागस आनंदात दडलेले आहे.त्यामुळे सशक्त शरीर असेल तर अनेक दुःखावर मात करून सुखाच्या मार्गाकडे वाटचाल करणे. आपल्या ध्येयाची दिशा ठरविणे आणि त्यासाठी अतोनात कष्ट उपसण्याची तयारी ठेवणे शक्य आहे. केवळ इच्छाशक्ती आहे, पण शरीर साथ देत नाही त्या व्यक्तीला त्याच्या आंतरिक इच्छेला लगाम घालावा लागतो.

शरीर संपत्ती मिळविण्यात अपयशी ठरलेले युवक उसळते साहस घेऊन जगण्याच्या ऐन उमेदीत आपल्या आजारांचे कौतुक करीत फिरताना दिसतात. कोणत्याही कार्यकर्तृत्वाचा आनंद घेण्यासाठी असमर्थ ठरलेल्या युवकांना आपले जीवन भकास वाटू लागते. त्यामुळे शरीर ही संपत्ती आहे, ते एक नादमधुर संगीत आहे, तो जीवनातील सर्वोच्च आनंद आहे, नव्हे तो स्वर्ग आहे. शरीराची महती स्पष्ट करताना खूप ज्येष्ठ व श्रेष्ठ विचारवंतांनी हे अनेकदा आपल्यासारख्या पामरांना सांगितले आहे. पण जेव्हा तरुणाईचे उसळते साहस रोमारोमांत संचार करते. तेंव्हा या शरीरधनाची जोपासना करणे, त्याम धून दीर्घायुरोग्य प्राप्त करुन घेणे आणि जीवनप्रवासातील दीर्घायुष्याचा परमोच्च आनंद घेणे या गोष्टीचा आम्हाला विसर पडतो. हे अगदी सहजसाध्य झाले आहे. यासाठी कोणतेही कष्ट घ्यावे लागले नाही. त्यामुळे जीवनातील व्यसनाधीनता, अविचार, वाममार्ग याचे आम्ही एवढ्या सहजपणे समर्थन करतो. त्या समर्थनामुळे भावी जीवनात निर्माण होणाऱ्या संकटाची तमा बाळगण्याची गरज युवकांना वाटली पाहिजे. उसळत्या साहसात विचारी बीजे रुजलेली असतील तर ती शक्ती सकारात्मक कार्याच्या दिशेने वाटचाल करेल. दिशाहीन उसळते साहस वाममार्गाच्या दिशेने वाटचाल करीत असेल तर ते शरीरधन युवाशक्तीच्या नाशाला कारणीभूत ठरते. युवाशक्तीकडे अत्यंत आशेने पाहणाऱ्या पालकांचा आधार जो युवक होऊ शकत नाही. ते शरीरधन काय उपयोगाचे? आपल्या शक्ती दिशाहीन होणार नाही हा विचार घेऊनच युवकांची दिनचर्या असली पाहिजे.

मानवी शरीर निसर्गाची अनमोल देणगी आहे. त्याचा उपयोग अविचाराने केल्यामुळे ज्यावेळी शरीर असंख्य व्याधींनी ग्रस्त होते तेंव्हा निर्माण होणारी सद्बुद्धी, हे वेळ निघून गेल्या नंतरचे शहाणपण आहे. आपल्या शहाणपणाचा उपयोग योग्य वेळीच करता आला पाहिजे. देहमंदिरावर आजाररूपी राक्षसी हल्ले होऊ लागल्यावर आम्ही जागे होतो. त्यानंतर वैद्यकीय इलाज करणे सुरू होते. पण एकदा का आजाररूपी हल्ले सुरू झाल्यावर बचावात्मक पवित्रा घेऊन करण्यात येणारे इलाज किती परिणामकारक ठरतील याची शाश्वती देता येत नाही. मनाचे आणि विचारांचे सामर्थ्य कोणत्याही औषधापेक्षा श्रेष्ठ असते. तेंव्हा त्या सामर्थ्याचा विचार आम्हाला केंव्हाच पडता कामा नये.

आपल्या आरोग्यावरच आपले मन, बुद्धी, भावना ह्यांची अवस्था अवलंबून असते. मनाविषयी विचार करताना अंतर्मन व बहिर्मन अशा दोन्ही अवस्थेचा विचार प्रामुख्याने आपल्याला करावा लागेल. दोन्ही मनात सुरू असलेले द्वंद्व हे बरेच वेळा न संपणारे असते. याचे महत्वाचे कारण अंतर्मनात सुरू असणाऱ्या आंतरक्रिया बहिर्मनाशी जुळत नाहीत. सारांश आत चालले काय, आणि बाहेर दाखवतो काय? अशी अवस्था प्रामुख्याने बऱ्याच युवकांची आपल्याला दिसते.

दिसणे आणि असणे हे जर प्रामुख्याने वेगवेगळे असेल तर आपली नेहमीच फसगत होत राहते.हे दिसणे व असणे इतरांची फसवणूक करण्याच्या संदर्भात नसेल तर एक वेळ ते फारसे घातक ठरणार नाही, पण पुढे असा प्रश्न निर्माण होतो की आपण स्वप्रतारणा का करावी? मुक्त, स्वच्छंदी अगदी निर्मळ झऱ्यासारखं का जगता येऊ नये? बहुतांशी अतिसंकोची, अव्यक्त स्वभावाचे युवक मोठ्या प्रमाणात स्वप्रतारणा करून घेतात. त्याचे महाभयंकर दुष्परिणाम ते भोगत असतात.

असणे आणि भासवणे ही एक प्रचंड कला आहे, असे समजणारे अनेक महाभाग असतात. त्यामुळे अगदी सहजपणे बनवाबनवी करण्यात आपण यशस्वी होतो. हा दृढ विश्वास असणारे युवक आपल्या जीवनातील विश्वासाहर्ता तर गमावतातच, पण त्यांच्या अंतर्मनात व बहिर्मनात नेहमीच सुरू असणारे महायुद्ध यांच्या मनोविश्वाचा विध्वंस करीत असते. काही कालावधीची 'अशी ही बनवाबनवी' नेमकी आपल्याला अगदी कडेलोटाच्या शिखरावर कशी घेऊन गेली? त्यानंतर ती आपल्या भवितव्याची 'कशी ही बनवाबनवी' झाली. हे या महान कलाकाराला कळत नाही. जेंव्हा कळते, तेंव्हा त्या कळण्याचा काहीच उपयोग नसतो, कारण चुकीच्या मनो व्यापारामुळे त्याने माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमावलेला असतो.

युवावस्थेत ही बाब खूप लक्षात घेण्यासारखी आहे, आपण माणूस म्हणून जगण्याचा अधिकार केंव्हाच गमविता कामा नये. आपल्या बुद्धीचा होणारा विकास आपल्याला स्वार्थाकडे, कुसंगतीकडे किंवा वामर्गाकडे नेऊ शकतो, पण आपल्या मनाचा आणि भावनेचा विकास आपल्याला केंव्हाच वाईट दिशेने नेऊ शकत नाही. मन, भावना आपल्याला मानवी शरीरातील यंत्र बनू देत नाहीत.आपल्या अगोदर इतर व्यक्तीच्या सुख-दुःखाचा विचार करायला लावते ते मानवी मन. ते आपल्याला या पर्यावरणातील प्रत्येक जीवसृष्टीचा विचार करायला लावते. पशु, पक्षी, प्राणी, वृक्ष, वल्ली या चराचरांत ते आपल्याला आत्मा आणि परमात्माचा विचार करायाला लावते. जेंव्हा बाल्यावस्थेपासून मानवी जीव हा विचार करायला लागतो. तेंव्हा त्याला वेगळ्या ईश्वरभक्तीची गरज नाही.तो प्रत्येक जीवाशिवातील ईश्वरापर्यंत पोहचतो. तो जीवसृष्टीत एकरूप होतो.तो मानवी जीवनाचा खरा आनंद घेतो. इहलोकीचा मोक्ष तोच पाहतो आणि क्षणोक्षणी ईश्वरभक्तीचा आनंद तोच घेतो.

ईश्वर आपले मनोरथ तेंव्हाच पूर्ण करेल जर तुमचा प्रयत्नवादावर पूर्ण विश्वास असेल. माउलीने पसायदानात उल्लेख केला. जो जे वांच्छील तो ते लाहो प्राणिजात, पण याचा अर्थ समजून घेतांना केवळ भक्तीने ते प्राप्त होऊ शकणार नाही. त्याला तुमची अपार मेहनत, शक्ती, बुद्धी, नियोजन सर्वच गोष्टीची जोड हवी. ईश्वरभक्ती यासाठी आवश्यक आहे. मला सद्विचाराचा व सत्कार्याचा विसर पडू नये. माझ्या मनात राग, द्वेष, कुवासना, लालसा निर्माण होऊ नये. इतरांचे सुख, आनंद पाहून माझ्या मनात द्वेष निर्माण होऊ नये. मला माणूस म्हणून आनंदात जगता यावं. प्रत्येक प्रसंगी माझ्या मनात सकारात्मक विचारांचा वास असावा. ईश्वरभक्ती, नामस्मरण यासाठी आहे. ईश्वरभक्तीचे केवळ नाटक करून सर्वसामान्यांची फसवणूक करणारे काही थोडे नाहीत. मनुष्य वर्तनासंबंधी विचार केला असता 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असणारच. मनुष्यवर्तनासंबंधी निश्चित निष्कर्ष काढणे खूप कठीण आहे. मनुष्यजीवन असंख्य अनिश्चीततेने, संघर्षाने व थोडक्यात युद्धाने भरलेले आहे.

संत तुकाराम महाराज म्हणतात,
रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग।।
अंतर्बाह्य जग आणि मन।।

ज्याचा मन आणि भावनांवर ताबा तो जग जिंकू शकतो. त्याला अशक्य असे काही नाही. मन आणि भावना ताब्यात ठेवण्यासाठी आमच्या विचारांची व्यापकता वाढवून मनोनिग्रह करणे आवश्यक आहे. आमच्या युवाशक्तीला विचारांची व मनोनिग्रहाची जोड मिळो व ही शक्ती राष्ट्र कार्याच्या सत्कारणी लागो. हीच सर्व ज्येष्ठांची मनोकामना. या देशातील समस्त युवकांना राष्ट्रभक्तीचे महत्व कळेल, तेंव्हा आमच्या देशाचे भविष्य उज्वल असेल, हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्यवेत्याची गरज असणार नाही.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# आयकर: बचत, नियोजन आणि कायदेशीर जबाबदारी




२४ जुलै रोजी भारतात 'राष्ट्रीय आयकर दिन' साजरा केला जातो. कर हा केवळ सरकारला दिलेला पैसा नसतो, तर तो देशाच्या विकासात प्रत्येक नागरिकाने दिलेले योगदान असते. आजच्या काळात आर्थिक साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. आपण उत्पन्न मिळवतो, बचत करतो, गुंतवणूक करतो; परंतु त्या उत्पन्नाचे योग्य नियोजन आणि कायदेशीर पद्धतीने आयकर भरणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. आयकर हा केवळ एक आर्थिक व्यवहार नसून तो प्रत्येक जबाबदार नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

योग्य कर नियोजनामुळे आपण कायदेशीररीत्या करबचत करू शकतो, आर्थिक सुरक्षितता मिळवू शकतो आणि भविष्यासाठी सक्षम आर्थिक पाया उभारू शकतो. त्याचबरोबर वेळेवर आयकर विवरणपत्र भरून आणि कर नियमांचे पालन करून आपण पारदर्शक व जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका बजावतो.

**आयकर:** बचत, नियोजन आणि कायदेशीर जबाबदारी या विषयातून आपण आयकराचे महत्त्व, करबचतीचे कायदेशीर मार्ग, आर्थिक नियोजनाची आवश्यकता आणि प्रत्येक करदात्याची जबाबदारी यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत. आयकर म्हणजे व्यक्ती, संस्था किंवा कंपनीने एका आर्थिक वर्षात मिळवलेल्या उत्पन्नावर केंद्र सरकारकडून आकारला जाणारा कर होय. सरकारने निश्चित केलेल्या नियमांनुसार आणि करपात्र उत्पन्नावर हा कर भरावा लागतो.

आयकराचा मुख्य उद्देश सरकारला विकासकामांसाठी आवश्यक आर्थिक साधने उपलब्ध करून देणे हा आहे. आयकरातून मिळणारा महसूल शिक्षण, आरोग्य, संरक्षण, पायाभूत सुविधा आणि विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरला जातो. तसेच आर्थिक समतोल राखण्यास आणि देशाच्या प्रगतीला चालना देण्यास आयकर महत्त्वाची भूमिका बजावतो.

आयकर भरणे हे प्रत्येक पात्र नागरिकाचे कायदेशीर कर्तव्य आहे. वेळेवर आयकर भरल्याने कायद्याचे पालन होते, आर्थिक विश्वासार्हता वाढते आणि दंड किंवा इतर कायदेशीर अडचणी टाळता येतात. तसेच आयकर विवरणपत्र, कर्ज, व्हिसा आणि इतर आर्थिक व्यवहारांसाठीही उपयुक्त ठरते. आयकरातून मिळणारा निधी रस्ते, पूल, शाळा, रुग्णालये, संरक्षण व्यवस्था, कृषी आणि विविध सार्वजनिक सेवांच्या विकासासाठी वापरला जातो. त्यामुळे आयकर हा केवळ कर नसून देशाच्या विकासात प्रत्येक नागरिकाने दिलेले महत्त्वपूर्ण योगदान आहे.

आयकर आणि आर्थिक नियोजन हे एकमेकांशी संबंधित महत्त्वाचे घटक आहेत. योग्य आर्थिक नियोजन केल्यास उत्पन्नाचा योग्य वापर करता येतो, करबचत करता येते आणि भविष्यासाठी आर्थिक सुरक्षितता निर्माण करता येते. केवळ जास्त उत्पन्न मिळवणे महत्त्वाचे नसून त्या उत्पन्नाचे योग्य व्यवस्थापन करणेही तितकेच आवश्यक आहे. उत्पन्नाचे योग्य नियोजन करताना खर्च, बचत आणि गुंतवणूक यांचा समतोल राखणे गरजेचे असते. नियोजनबद्ध पद्धतीने आर्थिक निर्णय घेतल्यास अनावश्यक खर्च कमी होतो आणि भविष्यातील गरजांसाठी पुरेशी आर्थिक तरतूद करता येते. आयकर कायद्यानुसार उपलब्ध असलेल्या विविध करसवलती आणि वजावटींचा योग्य वापर करून कायदेशीर मार्गाने करबचत करता येते. यामुळे कराचा भार कमी होण्यास मदत होते आणि आर्थिक नियोजन अधिक प्रभावी बनते. दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी योग्य गुंतवणूक करणे आवश्यक आहे. निवृत्ती नियोजन, शिक्षण, घर खरेदी किंवा इतर महत्त्वाच्या गरजांसाठी नियमित आणि शिस्तबद्ध गुंतवणूक आर्थिक स्थैर्य निर्माण करते.

आर्थिक शिस्त ही यशस्वी आर्थिक जीवनाची गुरुकिल्ली आहे. नियमित बचत, योग्य खर्च, वेळेवर कर भरणे आणि जबाबदारीने आर्थिक निर्णय घेणे यामुळे व्यक्तीचे आर्थिक भविष्य अधिक सुरक्षित होते. त्यामुळे आयकराचे योग्य नियोजन आणि आर्थिक शिस्त ही समृद्ध व सुरक्षित भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

आयकरातून बचत करणे म्हणजे कायदेशीर मार्गांचा वापर करून कराचा भार कमी करणे आणि आर्थिक नियोजन अधिक प्रभावी बनवणे होय. योग्य कर नियोजन केल्यास व्यक्तीला आर्थिक लाभ मिळतो तसेच भविष्यासाठी सुरक्षितता निर्माण करता येते. करबचतीसाठी सरकारने विविध पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. आयकर कायद्यातील तरतुदींनुसार उपलब्ध असलेल्या वजावटी आणि करसवलतींचा योग्य वापर करून कायदेशीर पद्धतीने करबचत करता येते. निवृत्ती नियोजन, मुलांचे शिक्षण, आरोग्य सुरक्षा आणि दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांसाठी योग्य गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यामुळे भविष्यातील आर्थिक गरजा पूर्ण करण्यास मदत होते. अनावश्यक करभार टाळण्यासाठी उत्पन्न, खर्च आणि गुंतवणुकीचे योग्य नियोजन करणे, वेळेवर आयकर विवरणपत्र भरणे आणि कर नियमांचे पालन करणे महत्त्वाचे आहे. योग्य नियोजनामुळे करबचत तसेच आर्थिक स्थैर्य दोन्ही साध्य करता येते. आयकर भरणे ही प्रत्येक पात्र करदात्याची कायदेशीर जबाबदारी आहे. कर नियमांचे योग्य पालन केल्यास आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राहते आणि भविष्यातील कायदेशीर अडचणी टाळता येतात. वेळेत आयकर विवरणपत्र भरणे आवश्यक आहे. यामुळे करदात्याची आर्थिक नोंद व्यवस्थित राहते आणि दंड किंवा व्याजासारख्या अतिरिक्त भारापासून बचाव होतो. करदात्याने आपल्या उत्पन्नाची योग्य आणि पूर्ण माहिती आयकर विभागाला देणे गरजेचे आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

आयकराशी संबंधित आवश्यक कागदपत्रे, जसे की उत्पन्नाचे पुरावे, गुंतवणुकीची माहिती आणि कर भरल्याच्या नोंदी सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे. यामुळे भविष्यात कोणत्याही पडताळणीच्या वेळी अडचणी येत नाहीत. कर नियमांचे पालन करणे ही जबाबदार नागरिकाची ओळख आहे. चुकीची माहिती देणे, उत्पन्न लपवणे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास दंड, व्याज आणि इतर कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते. म्हणूनच योग्य माहिती, वेळेवर करभरणा आणि नियमांचे पालन करून प्रत्येक करदात्याने आपली कायदेशीर जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी.

आयकरदाता हा देशाच्या आर्थिक व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. प्रत्येक करदात्याला आपले हक्क समजून घेणे आणि त्याचबरोबर आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडणे आवश्यक आहे. करदात्यांनी नेहमी पारदर्शक आर्थिक व्यवहार ठेवावेत आणि उत्पन्नाची योग्य माहिती शासनाला द्यावी. आयकर कायद्यानुसार उपलब्ध असलेले अधिकार, करसवलती आणि सुविधांची माहिती घेणे हा प्रत्येक करदात्याचा हक्क आहे. शासनाने ठरवलेल्या आयकर नियमांचे पालन करणे, वेळेत कर भरणे आणि आवश्यक माहिती सादर करणे ही करदात्यांची जबाबदारी आहे. आर्थिक प्रामाणिकपणा जपल्याने विश्वासार्हता वाढते आणि देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लागतो.

जबाबदार करदाता म्हणून योग्य माहिती देणे, नियमांचे पालन करणे आणि पारदर्शक व्यवहार ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची महत्त्वाची भूमिका आहे. आयकर भरण्यामुळे व्यक्तीचे आर्थिक नियोजन अधिक प्रभावी होते. उत्पन्न, बचत आणि गुंतवणुकीचे योग्य व्यवस्थापन केल्याने भविष्यातील आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होते.

आयकर विवरणपत्र भरल्यामुळे आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वासार्हता निर्माण होते. कर्ज घेणे, व्हिसासाठी अर्ज करणे किंवा इतर आर्थिक व्यवहार करताना आयकर नोंदी उपयुक्त ठरतात. याशिवाय, नागरिकांनी भरलेल्या आयकरातून सरकारला विकासकामांसाठी निधी मिळतो. रस्ते, शिक्षण, आरोग्य सेवा, संरक्षण आणि इतर सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी आयकराचा महत्त्वपूर्ण उपयोग होतो. म्हणून आयकर हा केवळ कर नसून वैयक्तिक आर्थिक शिस्त आणि देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक योगदान आहे. आयकर हा प्रत्येक नागरिकाच्या आर्थिक जीवनातील महत्त्वाचा घटक आहे. योग्य माहिती, योग्य नियोजन आणि कायदेशीर पालन यामुळे आर्थिक सुरक्षितता प्राप्त होते आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना निर्माण होते.

आयकराचे योग्य व्यवस्थापन केल्याने आर्थिक शिस्त वाढते, व्यवहारांमध्ये पारदर्शकता राहते आणि भविष्यासाठी मजबूत आर्थिक पाया तयार होतो. तसेच भरलेल्या आयकरातून देशाच्या विकासाला, पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक सेवांना मोठा हातभार लागतो. योग्य माहिती, योग्य नियोजन, कायदेशीर पालन म्हणजेच आर्थिक सुरक्षितता आणि जबाबदार नागरिकत्व. म्हणूनच आयकर हा केवळ कर नसून आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि राष्ट्रनिर्मितीचा महत्त्वाचा आधार आहे.


**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड.
मो. ९७६७८३०४९८

# सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते स्वर्गीय जयंत सावरकर यांच्या आज तिसऱ्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

२४ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८७व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी रंगभूमीने अभिनयाची उपासना करणारा, कलेशी अखंड निष्ठा राखणारा आणि रंगभूमीला आयुष्य अर्पण करणारा एक सच्चा रंगकर्मी गमावला.

३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेल्या जयंत सावरकरांनी उपजीविकेसाठी मुंबई गाठली. काही काळ त्यांनी नोकरी केली; मात्र अभिनयाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना. अखेर त्यांनी नोकरीचा सुरक्षित मार्ग सोडून रंगभूमीचा खडतर प्रवास स्वीकारला. त्यांच्या या निर्णयाला सुरुवातीला कुटुंबातून



विरोध झाला, तरीही त्यांनी आपल्या ध्येयाशी तडजोड केली नाही. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी बॅकस्टेज कलाकार म्हणूनही काम केले. मात्र संयम, जिद्द आणि स्वतःच्या कर्तृत्वावर असलेला विश्वास यामुळे त्यांना अभिनयाच्या संधी मिळू लागल्या. भूमिका मोठी की छोटी, यापेक्षा ती किती परिणामकारक आहे, यालाच त्यांनी महत्त्व दिले. त्यामुळे अगदी छोट्या भूमिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी छाप उमटवली आणि अल्पावधीतच मराठी रंगभूमीवरील एक प्रभावी अभिनेता म्हणून ओळख निर्माण केली.

पुढे त्यांनी अनेक नाटकांत प्रमुख भूमिका साकारल्या. एकच प्याला मधील तळीराम, तुझे आहे तुजपाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतू बर्वा आणि हरितात्या या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. सौजन्याची ऐसी तैशी, टिळकआगरकर, ययातीदेवयानी आणि सूर्यास्त यांसारख्या नाटकांमधील त्यांचा अभिनय विशेष गाजला.

मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते चंद्रकांत कुलकर्णी आणि मंगेश कदम यांसारख्या विविध पिढ्यांतील दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले. शंभरहून अधिक नाटकांबरोबरच तीसहून अधिक मराठी व हिंदी चित्रपट आणि अनेक दूरचित्रवाणी मालिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. तरीही त्यांची खरी ओळख रंगभूमीवरील सिद्धहस्त कलाकार अशीच राहिली.

जयंत सावरकर यांच्या अभिनयात कृत्रिमता नव्हती. सहज, नैसर्गिक आणि जीवनाशी जोडलेला अभिनय हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यामुळे रंगमंचावरची त्यांची प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आपल्या घरातील एखाद्या माणसासारखी वाटायची. अभिनयातील ही सहजता आणि प्रामाणिकपणाच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे रहस्य होते. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. अखिल भारतीय नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. तसेच १९९७ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. एक छोटा माणूस हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या कलाप्रवासाचे प्रेरणादायी दस्तऐवज आहे.

आज त्यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी त्यांची आठवण काढताना जाणवते की, कलाकाराचे शरीर काळाच्या पडद्याआड जाते; परंतु त्याची कला आणि त्याने साकारलेल्या भूमिका कायम जिवंत राहतात. जयंत सावरकर यांनी आपल्या अभिनयातून मराठी रंगभूमीला समृद्ध केले आणि असंख्य कलाकारांना प्रेरणा दिली. त्यांचे योगदान मराठी नाट्यविश्व कधीही विसरणार नाही.

ज्येष्ठ रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर यांना तिसऱ्या स्मृतिदिनी भावपूर्ण विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान उत्साहात संपन्न

## नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान नुकतेच पार पडले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध शासकीय विभागांनी एकाच ठिकाणी नागरिकांना शासकीय योजनांची माहिती, अर्ज स्वीकृती, मार्गदर्शन व विविध सेवांचा लाभ उपलब्ध करून दिला.



या शिबिरामध्ये संजय गांधी निराधार योजना विभाग, पुरवठा विभाग (तहसील कार्यालय नांदेड), तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उपअधीक्षक भूमि- अभिलेख कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, उमेद ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), पंचायत समिती ग्रामविकास विभाग, सायबर सेल व भरोसा सेल (जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड), जिल्हा रेशीम अधिकारी कार्यालय, अनुलोम संस्था, अमृत विभाग, महावितरण विभाग, पशुसंवर्धन विभाग, आरोग्य विभाग तसेच पीएम स्वनिधी योजना आदी विभागांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

एकूण ३४२९ नागरिकांनी विविध विभागांच्या स्टॉलला भेट देऊन शासकीय योजनांची माहिती व सेवा घेतल्या. त्यात सदर योजनांचा समावेश आहे. जिवंत सातबारा वाटप, महिला शेतकरी प्रमाणपत्र वाटप, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलियर प्रमाणपत्र, शेतकरी प्रमाणपत्र, भूमिहीन प्रमाणपत्र, जन्म-मृत्यू दाखले, रहिवासी प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कर्जवाटप, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत बचत गटांना कर्जवाटप, लेक लाडकी योजना, लखपती दीदी योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, प्राधान्य गट लाभार्थींना शिधापत्रिका वाटप, बेबी किट वाटप, अमृत प्रशिक्षण योजना, भूमी अभिलेख विभागाची स्वामित्व योजना, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), रमाई आवास योजना, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान, राज्य कृषी यांत्रिकीकरण योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना तसेच प्रधानमंत्री स्वनिधी योजना अशा शासनाच्या विविध लोकाभिमुख योजना व सेवांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात आला.

यावेळी पात्र ८६० लाभार्थ्यांना विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. यामध्ये उमेद ग्रामीण जीवनोन्नती अभियान-५०, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम)-६०, प्रमाणपत्र/ आधार सेवा-१००, रेशन कार्ड-१००, पीएम स्वनिधी-२०, पंचायत समिती-१००, तालुका आरोग्य अधिकारी-३०, रमाई आवास-५०, अमृत विभाग-३०, सीडीपीओ (ग्रामीण)-२०, सीडीपीओ (शहर)-५०, तालुका कृषी अधिकारी-५०, महावितरण विभाग-५०, सहकार विभाग-५० तसेच परिवहन विभागामार्फत १०० लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

या शिबिरादरम्यान डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा ३४१६ नागरिकांनी लाभ घेतला. हा उपक्रम अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

याचबरोबर शिबिरामध्ये रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून, अनेक रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे, त्यांच्या समस्या तत्काळ सोडविणे आणि प्रशासन व नागरिक यांच्यातील समन्वय अधिक दृढ करणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता. या यशस्वी आयोजनासाठी सर्व शासकीय विभाग, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमास ना. हेमंत पाटील, महापौर कविता मुळे, आ. आनंदराव बोंढारकर, उपमहापौर दीपकसिंग रावत, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, नगरसेवक काकडे, शीतल खांडील, जिल्हा अधीक्षक (भूमी अभिलेख) सीमा देशमुख, मुद्रांक विभागाचे जिल्हाधिकारी महेश वडदकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, तालुका कृषी अधिकारी संजय चातरमल, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक बळवंत मस्के, धम्मदीप ढवळे, माविमचे राहुल शिंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे, सीडीपीओ शिवगंगा पवार, डीसीपीओ विद्या आळणे, कैलास तिडके, पीएम स्वनिधी योजनेचे किशन कदम, महावितरणचे सुशीलकुमार वाघमारे, आवास योजनेचे प्रकाश कांबळे, सामाजिक वनीकरण विभागाचे लाखेकर, गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, सायबर पोलीस सेलचे पोलीस निरीक्षक विलास सप्रे, नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, भरोसा सेलच्या रूपाली कानगुले, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कंकावार, अनुलोम सामाजिक संस्थेच्या पूजा गोडघासे, आपले सरकार सेवा केंद्राचे विजय जोंधळे तसेच नांदेड मध्यवर्ती बसस्थानकाचे आगार प्रमुख दिग्विजय नरंगले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यांसह नांदेड दक्षिण मतदार संघातील हजारो नागरिक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट व प्रभावी निवेदन मुरलीधर हंबर्डे यांनी केले.

# डॉ. भरत तोष्णीवाल यांचा संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांच्या हस्ते सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)–** नवीदिल्ली येथील कॉन्स्टीट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे राष्ट्रीय इंडीयन मेडीकल असोसिएशन (आयएमए) ने आयोजित केलेल्या समारंभात डॉ. भरत अनिल तोष्णीवाल यांना डॉक्टर्स डे अकॅडमीक एक्सलन्स ॲवार्ड प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार भारताचे संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांच्या हस्ते देण्यात आला.

हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळवणारे ते मराठवाड्यातील डॉक्टर असून, या पुरस्काराचे ते सर्वात युवा मानकरी ठरले आहेत.

आतापर्यंत १५० पेक्षा जास्त स्थानिक, प्रादेशीक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषद आणि संवादामध्ये वक्ता म्हणून डॉ. भरतने संबोधन केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय इंडीयन मेडीकल असोसिएशन दिल्ली यांनी त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली आहे. दरवर्षी भारतामधून ५ डॉक्टरांना हा पुरस्कार देण्यात येतो.

अतिशय शानदार सोहळ्यात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या वेळी खा. मन्नेकाभाई नायर, आयएमएचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनिलकुमार नायर, राष्ट्रीय सचिव डॉ. सौरभी दत्ता, संस्थेचे ज्येष्ठ सदस्य व डॉक्टर्स उपस्थित होते.

यापूर्वी २०२४ मध्ये सुध्दा डॉ. भरत यांना आयएमएचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. नुकत्याच पुणे येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय ब्रॉकोकॉन परिषदेत त्यांना संस्थेची मानद फेलोशिप Fellow of Bronchoscopy ssociaton of India (एफबीआयए) देऊन गौरव करण्यात आला होता. डॉ. भरत हयांच्या गौरवाबद्दल सर्वस्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# शीख वेलफेयर असोसिएशनतर्फे वरिष्ठ नागरिक, नगरसेवक व विद्यार्थ्यांचा सत्कार

**नांदेड़ (प्रतिनिधी)–** नांदेड येथे कार्यरत शीख समाजाच्या वरिष्ठ नागरिकांची सेवाभावी संस्था शीख वेलफेयर असोसिएशनच्या वतीने वरिष्ठ नागरिकांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुरसाहेब गुरुद्वाराचे मुख्य जत्थेदार संतबाबा कुलवंतसिंघ आणि गुरुद्वारा श्री लंगर साहेबचे मुखी संतबाबा बलविंदरसिंघ करसेवावाले यांची व गणमान्य व्यक्तींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमात शीख समाजातील ८० वय पूर्ण करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. सोबतच नुकतेच निवडून आलेल्या शीख समाजातील पाच नगरसेवकांचाही सत्कार करण्यात येणार आहे.

दरवर्षीप्रमाणे दहावी आणि बारावी परीक्षेत गुणवंत ठरलेले आणि ६० टक्केपेक्षा अधिक गुण प्राप्त शीख समाजातील विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात येईल, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष सरदार लड्डूसिंघ महाजन यांनी दिली. येत्या रविवार, दि. २६ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता श्री गुरु अंगददेवजी यात्री निवास येथे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि पालक यांनी आवर्जून उपस्थित राहावे. तसेच सत्कारसाठी आपले नाव व गुणपत्रिकेची प्रत रविंदरसिंघ मोदी (मो. ९४२०६५४५७४), सतपालसिंघ शिलेदार अध्यापक खालसा हाईस्कूल ((मो. ८१४९२ ३००३१) आणि नारायणसिंघ नंबरदार सचिव शीख वेलफेयर असोसिएशन (मो. ९८६०० ११६९२) यांच्याकडे दि. २४ जुले २०२६ पर्यंत नोंद करुन घ्यावी. वरिष्ठ नागरिकांनी सत्कारासाठी आधार कार्ड आणि पासपोर्ट साइजच्या दोन फोटो पाठवण्याची व्यवस्था करावे असे ही आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर शीख वेलफेयर असोसियशन संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# किनवटमध्ये ४३ हजार रुपयांचा अवैध गुटखा; सुगंधित तंबाखू जप्त

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट शहरालगतच्या गोकुंदा भागातील रहमतनगर येथे मंगळवार, दि. २१ जुलै रोजी पोलिसांनी धाड टाकून अवैध गुटखा आणि सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत एका आरोपीविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोकुंदा येथील रहमतनगर परिसरात जावेद फरीद शेख हा बेकायदेशीररीत्या विविध कंपन्यांचा पानमसाला आणि सुगंधित तंबाखू चोरट्या मार्गाने विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी ४३ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी जमादार गजानन वेरूळकर यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात आरोपी जावेद फरीद शेख याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७४, २७५ अन्न व सुरक्षा अधिनियम कलम २६(१), २६(२), २६(४), ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गुटखा विक्री सुरूच

किनवट पोलिसांकडून अवैध गुटखा साठा, चोरट्या विक्रीविरुद्ध मोहीम जोरात सुरू असतानाही शहरात लपून छपून गुटखा विक्री सुरूच आहे. शेजारील तेलंगणा राज्यातून पुड्या आणून विकल्या जात आहेत. तर बंदीचा फायदा घेत विक्रेते कोणताही जर्दा ग्राहकांच्या माथी मारून त्यांच्या आरोग्याशी आणि खिशाशी खेळत आहेत.

# पोखरभोसी येथील श्रीकृष्ण गोशाळेत शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील पोखरभोसी येथील श्रीकृष्ण गोशाळेत महाराष्ट्र शासनाने २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन म्हणून घोषित केला असल्यामुळे हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यात गत तीन वर्षापासून स्वतंत्र गोसेवा आयोगाची स्थापना, गोमातेला राज्यमाता गोमाता असा दर्जा व प्रतिदिन प्रतिगाय पन्नास रुपये परिपोषण अशा विविध योजना राबवून गोवंशाचे जतन व संवर्धन होईल या हेतूने वाटचाल चालू आहे. या कार्यात गोसेवा आयोगाने मोठा पुढाकार घेऊन शासन दरबारी देशी गाईला विशेष स्थान मिळावे म्हणून प्रयत्न चालू आहेत.

३ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन, त्यानिमित्ताने आपल्या भागात असलेल्या शुद्ध देशी गोवंशाचे संरक्षण व संवर्धन व्हावे यासाठी जनसामान्यास आपल्या भागातील देशी वाणाची माहिती गुणधर्म व वैशिष्ट्य अशी माहिती व्हावी, तसेच शुद्ध देशी गोवंशाचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समिती करणार तीन दिवसीय नांदेड दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीचा जिल्ह्याचा ३ दिवसीय दौरा ५ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात जिल्ह्यातील विविध शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि आदिवासी विकासाशी संबंधित योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार असून, भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व जात पडताळणीसंदभार्तील बाबींचीही तपासणी केली जाणार आहे.

दौऱ्याच्या पहिल्या दिवशी (५ ऑगस्ट) सकाळी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद पदाधिकारी यांच्यासोबत अनौपचारिक चर्चा होणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महानगरपालिका, राज्य उत्पादन शुल्क, एसटी महामंडळ, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, महावितरण तसेच जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांसमवेत अनुसूचित जमाती प्रवर्गातील भरती, बढती, आरक्षण, अनुशेष आणि आदिवासी कल्याण योजनांचा विभागनिहाय आढावा घेतला जाणार आहे.

दुसऱ्या दिवशी (६ ऑगस्ट) समिती किनवट प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आश्रमशाळा, वसतिगृहे तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. संबंधित अधिकाऱ्यांसोबत योजनांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करून कामकाजाची माहिती घेतली जाणार आहे. तर तिसऱ्या दिवशी (७ ऑगस्ट) जिल्हाधिकारी कार्यालयात समारोपाची आढावा बैठक होऊन दौऱ्यात निदर्शनास आलेल्या त्रुटींवर आवश्यक कार्यवाहीवावत संबंधित विभागांना सूचना दिल्या जाणार आहेत.

# सिडको येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात श्री दुर्गा सप्तशती पारायण सोहळा





**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री दुर्गा सप्तशती भव्य पारायण सोहळा श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, रामनगर सिडको, नवीन नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. २१ जुलै रोजी पारायण सोहळ्यात ३५७७ महिलांनी सहभाग नोंदविला. यावेळी मृणाली राजूरकर यांच्यासह लोकप्रतिनिधी व मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग दिंडोरी प्रणीत अब्जचंडी सेवेअंतर्गत श्री दुर्गा सप्तशती पारायण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी दुर्गा सप्तशती पारायण सोहळ्यानिमित्त दुर्गा सप्तशती पाठाचे वाचन पर्जन्य वृष्टी होण्यासाठी करण्यात आले. यावेळी जवळपास ३५७७ महिलांनी सहभाग नोंदविला. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्री कुलदेवतेची सेवा सर्वांसाठी सुलभ आणि सोयीस्कर व्हावी यासाठी कौंदिन्यपूरच्या अच्युत महाराजांकडून प्राकृत भाषेत श्री दुर्गासप्तशती हा ग्रंथ लिहिला. गुरु प्रणीत मार्गामध्ये श्री कुलदेवतेच्या सेवेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुटुंबात एकत्ता व सौहार्दता, कुटुंबाचे पालनपोषण व संरक्षण, शिक्षण, नौकरी, विवाह, मुले, आजारपण या सर्व समस्या श्री दुर्गासप्तशती ग्रंथाच्या नियमित पठणाने दूर होतात व आई भगवतीची कृपाशीर्वाद प्राप्त होतो. श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे पिठाधीश गुरुमाऊली यांनी जगातील सर्व प्रकारचे संकट दूर होण्यासाठी दिंडोरी प्रणीत सेवा मार्गाच्या माध्यमातून अनेक प्रकारच्या अध्यात्मिक उपासना घेतल्या आहेत. त्यामध्ये सहस्त्रचंडी, लक्षचंडी, कोटीचंडी या सेवेचा सहभाग होतो. तसेच गेल्या काही वर्षांपूर्वी जगात व देशात विश्वशांती टिकून रहावी तसेच राष्ट्रावर येणारे संकट दूर होण्यासाठी अब्जचंडी सेवेचा विराट असा संकल्प गुरुमाऊली यांनी सोडला आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिक विद्या वृद्धाश्रमात अन्नदान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त श्री शिवानंद स्वामी संस्थान सिद्धनाथ येथील ज्येष्ठ नागरिक विद्या वृद्धाश्रम येथे अन्नदानाचे वाटप करण्यात आले.

२२ जुले रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कु. श्रावणी सूर्यकांत शिंदे हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री शिवानंद स्वामी संस्थान सिद्धनाथ ज्येष्ठ नागरिक विद्या वृद्धाश्रम येथे अन्नदानाचे वाटप करण्यात आले.

यावेळी सुषमा सूर्यकांत शिंदे पांडुरंग बुद्धेवार, प्रियाताई बासेवाड, राम मुलंगे व मनपाच्या भाजपा प्रभाग १९ च्या नगरसेविका सुलोचना धोंडीबाराव काकडे, सुषमा सूर्यकांत शिंदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गणेश काकडे, सूर्यकांत शिंदे, राहुल नागोराव मानवते यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# २८ जुलै रोजी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने रास्ता रोको

**नांदेड (प्रतिनिधी) –** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (नांदेड-लातूर) वरील विष्णुपुरी येथील पुलाची संरक्षक भिंत कोसळल्याची घटना नुकतीच घडली आहे. या घटनेची चौकशी करण्याच्या मागणीसाठी वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने या महामार्गावर विविध ठिकाणी रास्ता रोको करुन काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे यांच्या वतीने देण्यात आला.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (नांदेड-लातूर) वरील विष्णुपुरी येथील पुलाची संरक्षक भिंत कोसळल्याची अत्यंत गंभीर घटना घडली आहे. सदर काम अद्याप दोषदायित्व व निवारण कालावधी अंतर्गत असताना ही संरचना भिंत कोसळल्यामुळे संबंधित कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका निर्माण झाली आहे. ही घटना अत्यंत धोकादायक असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, ही घटना घडली नसती किंवा त्यावेळी वाहनांची वर्दळ असती तर मोठी जीवित व वित्तहानी झाली असती. त्यामुळे या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी होणे अत्यावश्यक आहे.

या पुलाचे काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदार कंपनीविरुद्ध निष्काळजीपणा, निकृष्ट दर्जाचे बांधकाम व सार्वजनिक जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, संबंधित कामाचे पर्यवेक्षण करणारे अभियंते, सल्लागार व जबाबदार अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर व हलगर्जीपणा केल्याबद्दल प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ वरील सर्व पूल, संरक्षक भिंती व इतर संरचनांचे स्वतंत्र तज्ज्ञ संस्थेमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, सदर पुलाचे तसेच संबंधित कामात वापरण्यात आलेल्या काँक्रीट, स्टील व इतर बांधकाम साहित्याचे मटेरियल टेस्टिंग करण्यात यावे, कामामध्ये आर्थिक अनियमितता, भ्रष्टाचार किंवा संगनमत झाले आहे का, याची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात यावे, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कंपनीला नवीन शासकीय कामे देण्यास स्थगिती देण्यात यावी व आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्यात यावी, चौकशी अहवाल सार्वजनिक करण्यात यावा तसेच दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, या महामार्गाचे काम करणाऱ्या कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन हे कंत्राट काढून घ्यावे तसेच या कंपनीला काळ्या यादीत टाकावे या मागण्यांची पूर्तता येत्या ७ दिवसांत पूर्ण न झाल्यास दि. २८ जुलै २०२६ रोजी वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने या महामार्गावर विविध ठिकाणी रास्तारोको करुन काम बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे यांनी दिला आहे.

# स्वारातीम विद्यापीठात 'युवा कट्टा' कार्यक्रम उत्साहात संपन्न

## विविध ज्वलंत विषयांवर विद्यार्थ्यांनी मांडले परखड विचार; चारोळ्या व कवितांनी रंगवला कट्टा

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत लोकसेवा प्रसारक, आकाशवाणी परभणी आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या प्रेरणेने व प्रोत्साहाने दि. २२ जुलै रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात (सिनेट हॉल) अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात 'युवा कट्टा' हा विशेष कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी. (संशोधक) विद्यार्थ्यांनी विविध समकालीन विषयांवर आपले मोलाचे विचार मांडले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्ष-स्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार हे होते. प्रमुख अथिती म्हणून परभणी आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी सदानंद कामडी उपस्थित होते, तर विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध निवेदिका सुमेधा कुलकर्णी, सुषमा कुलकर्णी आणि डॉ. सुहास पाठक व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नीट पेपर लीक प्रकरण, पर्यावरण परिणाम व जीवनदान, विद्यापीठ शिक्षणाचे अनुभव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षणातील बदल, युवकांमधील व्यसनाधीनता, बालविवाह व हुंडा पद्धती, तसेच कृषी धोरण आणि चालू घडामोडी यांसारख्या अत्यंत गंभीर व महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा केली. विशेष म्हणजे काही होतकरू विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतादरम्यान सुंदर चारोळ्या व कविता सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी केले. या कार्यक्रमामुळे विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांमधील बौद्धिक व सुसंवाद कौशल्य प्रभावीपणे अनुभवास मिळाले.

# अंतर्मन

# नागपंचमी कधी आहे?

## देशात दोन वेळा नागपंचमी का साजरी केली जाते? जाणून घ्या तारीख, महत्त्व आणि पूजाविधी...

**श्रावण महिन्यातील पंचमी तिथीला नागपंचमीचा सण साजरा केला जातो. विशेष म्हणजे श्रावणातील कृष्ण पक्ष आणि शुक्ल पक्ष या दोन्ही पंचमी तिथींना वेगवेगळ्या भागांत नागपंचमी साजरी करण्याची परंपरा आहे. या दिवशी नागदेवतेची पूजा करून सुख, समृद्धी आणि सर्पभयापासून संरक्षण मिळावे, अशी प्रार्थना केली जाते.**

पंचांगानुसार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावण कृष्ण पक्षातील पंचमी तिथीला नागपंचमी साजरी केली जाईल. ही पंचमी तिथी सूर्योदयापासून सुरू होऊन रात्री १०.५५ वाजेपर्यंत असेल. या दिवशी ओडिशा, बिहार, राजस्थान आणि पश्चिम बंगालसह काही राज्यांत नागपंचमी साजरी करण्याची परंपरा आहे, तर २७ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावण शुक्ल पक्षातील पंचमी तिथी सूर्योदयापासून सुरू होऊन सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. महाराष्ट्रासह भारतातील बहुतांश राज्यांत या दिवशी नागपंचमी साजरी केली जाते.

### दोन वेळा नागपंचमी का साजरी केली जाते?

श्रावण महिन्यात कृष्ण पक्ष आणि शुक्ल पक्ष अशा दोन्ही पक्षांत पंचमी तिथी येते. भारतातील विविध प्रदेशांमध्ये धार्मिक परंपरा आणि स्थानिक रूढींनुसार नागपंचमीची तारीख वेगवेगळी मानली जाते. त्यामुळे काही राज्यांत श्रावण कृष्ण पंचमीला, तर बहुतांश राज्यांत श्रावण शुक्ल पंचमीला हा सण साजरा केला जातो.



### नागपंचमीचे धार्मिक महत्त्व

धार्मिक श्रद्धेनुसार, ज्यांच्या कुंडलीत कालसर्प दोष असल्याचे मानले जाते, त्यांनी नागपंचमीच्या दिवशी नागदेवतेची पूजा केल्यास त्याचा प्रतिकूल प्रभाव कमी होतो, अशी समजूत आहे.
पौराणिक कथेनुसार, महाभारत काळात राजा परीक्षित यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांचा पुत्र राजा जन्मेजय यांनी सर्पसत्र यज्ञ सुरू केला होता. त्यावेळी आस्तिक मुनींनी नागवंशाचे रक्षण केले. त्या घटनेच्या स्मरणार्थ नागपंचमी साजरी केली जाते, अशीही मान्यता आहे. या दिवशी आस्तिक मुनींची पूजा केल्यास सर्पभय दूर राहते, असे मानले जाते.

### नागपंचमी पूजाविधी

- पहाटे लवकर उठून स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत.
- पूजास्थानी नागदेवता आणि आस्तिक मुनी यांची प्रतिमा किंवा चित्र स्थापित करावे.
- हळद-कुंकू लावून फुले अर्पण करावीत.
- स्वच्छ पाण्याने अभिषेक करावा.
- नागदेवतेची मनोभावे पूजा करून आरती करावी.
- या दिवशी भगवान शिवांचा रुद्राभिषेक करणेही अत्यंत शुभ मानले जाते.

# मूल दत्तक घेण्यापूर्वी या महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करा

**ज्योतिषशास्त्रानुसार काही दांपत्यांच्या जन्मकुंडलीत विवाहानंतर संततीप्राप्तीचा योग उशिरा, म्हणजे सात ते चौदा वर्षांनंतर दिसून येतो. मात्र अधीरपणा किंवा चुकीच्या सल्ल्यामुळे काही दांपत्ये त्याआधीच मूल दत्तक घेतात. नंतर त्यांच्या कुंडलीतील संततीयोग सक्रिय झाल्यानंतर त्यांना स्वतःची संततीही प्राप्त होते. अशा परिस्थितीत दत्तक मुलासाठी आणि कुटुंबासाठी भावनिक तसेच नैतिक पेचप्रसंग निर्माण होऊ शकतो, असे काही ज्योतिषतज्ज्ञांचे मत आहे.**

- दत्तक मूल घेण्यापूर्वी कुंडलीचे परीक्षण : दुसऱ्याचे मूल कायदेशीररीत्या दत्तक घेऊन त्याचे संगोपन करणे ही अत्यंत जबाबदारीची प्रक्रिया आहे. ज्योतिषशास्त्रानुसार दत्तक संततीचा विचार करण्यापूर्वी पती-पत्नीने अनुभवी ज्योतिषतज्ज्ञांकडून दोघांच्या जन्मकुंडलीचे सखोल परीक्षण करून घ्यावे, अशी शिफारस केली जाते. संयुक्त कुंडलीच्या अभ्यासातून संततीप्राप्तीचा योग आहे की नाही, असल्यास तो किती उशिरा आहे आणि संततीप्राप्तीचा संभाव्य काळ कोणता असू शकतो, याचा अंदाज व्यक्त केला जातो.
- नाडीदोष आणि संततीयोग : ज्योतिषशास्त्रात विवाह जुळवताना नाडीदोषाला विशेष महत्त्व दिले जाते. पारंपरिक मान्यतेनुसार नाडीदोषाचा संबंध संततीप्राप्तीशी जोडला जातो. त्यामुळे विवाहपूर्व कुंडली जुळविताना या दोषाचा विचार केला जातो.
- दत्तक हा शेवटचा पर्याय मानावा : काही ज्योतिषतज्ज्ञांच्या अनुभवानुसार, जन्मकुंडलीत विलंबाने संततीयोग असला तरी ऋषी-मुनी, गुरुजनांचे आशीर्वाद, दानधर्म, पुण्यकर्म आणि धार्मिक उपाय यांच्या प्रभावामुळे अपेक्षेपेक्षा लवकर संततीसुख प्राप्त झाल्याची उदाहरणे आढळतात, असे मानले जाते. त्यामुळे संततीप्राप्तीसाठी सर्वप्रथम वैद्यकीय उपचार आणि आवश्यक प्रयत्न करावेत. दत्तक संततीचा निर्णय हा सर्व बाजूंनी विचार करून अंतिम पर्याय म्हणून घ्यावा, असे मत व्यक्त केले जाते.
- प्राचीन ग्रंथांतील संततीयोग : ज्योतिषशास्त्रातील अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये विविध प्रकारच्या संततीयोगांचे वर्णन आढळते. त्यामध्ये दत्तक पुत्र योग, विलंब संतती योग, कन्या योग, प्रथम कन्या योग, केवळ कन्या योग, गर्भपात योग, शिशुहानी योग, संतानहीन योग तसेच विविध शापांमुळे संततीसुखात येणाऱ्या अडथळ्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये या योगांचे सविस्तर वर्णन आढळते.



- पंचमेशासाठी उपाय : ज्योतिषशास्त्रात पंचम भाव हा संततीचा भाव मानला जातो. या भावाचा स्वामी म्हणजे 'पंचमेश'. संततीयोग अधिक बळकट करण्यासाठी पंचमेशाशी संबंधित उपाय श्रद्धेने करावेत, असे अनेक ज्योतिषतज्ज्ञ सांगतात.

# देवशयनी एकादशी व्रताचे नियम : काय करावे आणि काय टाळावे? जाणून घ्या मार्गदर्शन...

**देवशयनी एकादशीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात चार महिन्यांसाठी योगनिद्रेत जातात आणि याच दिवसापासून चातुर्मासाची सुरुवात होते. यंदा देवशयनी एकादशी २५ जुलै, शनिवार रोजी साजरी केली जाणार आहे. शास्त्र आणि पद्मपुराणानुसार, या दिवशी व्रत करताना काही नियमांचे पालन करणे आवश्यक मानले जाते. त्यामुळे व्रताचे संपूर्ण पुण्यफळ मिळते, अशी श्रद्धा आहे. जाणून घेऊया देवशयनी एकादशीच्या व्रतात काय करावे आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात...**



### देवशयनी एकादशीला काय करावे?

- ब्रह्ममुहूर्तावर स्नान करून व्रताचा संकल्प करा : देवशयनी एकादशीच्या दिवशी शक्यतो ब्रह्ममुहूर्तावर उठून स्नान करावे. त्यानंतर भगवान विष्णूंचे ध्यान करून श्रद्धापूर्वक व्रताचा संकल्प करावा.
- भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची पूजा करा : या दिवशी भगवान विष्णूंना पिवळी फुले, तुळशीची पाने, पंचामृत आणि नैवेद्य अर्पण करावा. तसेच माता लक्ष्मीचीही विधीपूर्वक पूजा करावी. वैष्णव परंपरेनुसार तुळशीशिवाय विष्णूपूजा अपूर्ण मानली जाते.
- द्वादशाक्षरी मंत्राचा जप करा : पूजेदरम्यान ॐ नमो भगवते वासुदेवाय या द्वादशाक्षरी मंत्राचा जप करावा. हा भगवान विष्णूंच्या प्रमुख उपासना मंत्रांपैकी एक मानला जातो.
- सात्त्विक आहार घ्या : निराहार किंवा निर्जल उपवास करणे शक्य नसल्यास आपल्या प्रकृतीनुसार फलाहार करावा. व्रताचा उद्देश केवळ अन्नत्याग नसून मन, इंद्रिये आणि विचार यांवर संयम ठेवणे हा देखील आहे.
- दानधर्म आणि सेवाभाव जोपासा : गरजूंना अन्न, वस्त्र किंवा आपल्या क्षमतेनुसार दान करावे. तसेच सेवा, दया आणि परोपकार यांनाही या दिवशी विशेष महत्त्व दिले जाते.
- देवशयनी एकादशीला काय करू नये?
- तामसिक आहार टाळा : या दिवशी मांसाहार, मद्य आणि इतर तामसिक पदार्थांचे सेवन करू नये. धार्मिक मान्यतेनुसार, यामुळे व्रताचे पुण्यफळ कमी होऊ शकते.
- तांदूळ आणि धान्य खाऊ नका : एकादशीच्या दिवशी तांदूळ तसेच धान्याचे सेवन वर्ज्य मानले जाते. हा नियम व्रत करणाऱ्यांनी तसेच घरातील सदस्यांनीही पाळावा, अशी परंपरा आहे.
- राग, कटू वाणी आणि असत्य टाळा : एकादशीचा उपवास हा केवळ आहाराशी संबंधित नसून विचार आणि आचरणाच्या शुद्धीचाही दिवस मानला जातो. त्यामुळे रागावणे, कटू बोलणे किंवा असत्य बोलणे टाळावे.
- कोणाचाही अपमान किंवा हिंसा करू नका : या दिवशी कोणाचाही अपमान करू नये. तसेच हिंसात्मक कृती आणि वाईट वर्तनापासून दूर राहावे.
- द्वादशीला व्रताचे पारणे करा : एकादशीच्या व्रताचे पारणे द्वादशी तिथीला शास्त्रानुसार योग्य वेळी करावे. धार्मिक मान्यतेनुसार, नियमानुसार पारणे केल्यास व्रताचे संपूर्ण पुण्यफळ प्राप्त होते.

# भगवान विष्णूंना अर्पण करा ही तीन प्रिय फुले; घरात सुख, समृद्धी अन् भरभराटीची होईल कृपा

**देवशयनी एकादशीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यांसाठी योगनिद्रेत जातात आणि चातुर्मासाची सुरुवात होते, अशी धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे या दिवशी श्रीहरिंची विशेष पूजा, उपवास आणि भक्तिभावाने आराधना केली जाते. तसेच भगवान विष्णूंना प्रिय मानली जाणारी काही फुले अर्पण केल्यास घरात सुख, समृद्धी आणि आर्थिक भरभराट येते, अशी श्रद्धा आहे.**

यंदा देवशयनी एकादशी २५ जुलै, शनिवार रोजी येत आहे. याच दिवसापासून चातुर्मासाचा प्रारंभ होतो. धार्मिक मान्यतेनुसार, या एकादशीपासून भगवान विष्णू क्षीरसागरात चार महिन्यांसाठी योगनिद्रेत जातात. त्यामुळे या दिवशी त्यांची भक्तिभावाने पूजा केल्यास पुण्यप्राप्ती होते आणि श्रीहरींची कृपा लाभते, असे मानले जाते. जर जीवनात अडचणी, आर्थिक समस्या किंवा कार्यात वारंवार अडथळे येत असतील, तर या दिवशी भगवान विष्णूंना त्यांच्या आवडत्या फुलांचे अर्पण करणे शुभ मानले जाते.

- शंखपुष्पीची फुले अर्पण करा : धार्मिक मान्यतेनुसार, शंखपुष्पी हे भगवान विष्णूंना अत्यंत प्रिय फूल आहे. देवशयनी एकादशीच्या पूजेत हे फूल अर्पण केल्यास घरात समृद्धी, भरभराट आणि सकारात्मक ऊर्जा वाढते, अशी श्रद्धा आहे. तसेच श्रीहरींची कृपा प्राप्त होऊन जीवनातील अडचणी दूर होण्यास मदत होते, असे मानले जाते.
- पिवळ्या झेंडूची फुले अर्पण करा : भगवान विष्णूंना पिवळा रंग प्रिय मानला जातो. त्यामुळे त्यांच्या पूजेत ताज्या पिवळ्या झेंडूच्या फुलांचा किंवा फुलांच्या हाराचा समावेश करणे शुभ समजले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, यामुळे कार्यातील अडथळे दूर होतात, प्रगतीची संधी मिळते आणि जीवनात सकारात्मक बदल घडतात.
- कमळाचे फूल अर्पण करा : कमळ हे भगवान विष्णू तसेच माता लक्ष्मी यांना प्रिय मानले जाणारे पवित्र फूल आहे. देवशयनी एकादशीला कमळाचे फूल अर्पण केल्यास भगवान विष्णूंसह माता लक्ष्मीचीही कृपा प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे. यामुळे घरातील आर्थिक स्थिती मजबूत राहते आणि सुख-समृद्धी वाढते, असे मानले जाते. याशिवाय, या दिवशी भगवान विष्णूंना इतर पिवळ्या रंगाची ताजी फुलेही अर्पण करू शकता.







# घराबाहेर नेम प्लेट लावण्यापूर्वी जाणा वास्तुशास्त्रीय नियम

**वास्तुशास्त्रानुसार घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावलेली नेम प्लेट ही केवळ घराची ओळख नसून, सकारात्मक ऊर्जेचे आकर्षण करणारा महत्त्वाचा घटक मानली जाते. योग्य दिशा, योग्य साहित्य आणि योग्य पद्धतीने नेम प्लेट लावल्यास घरात सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. मात्र, वास्तुनियमांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे प्रतिकूल परिणामही जाणवू शकतात. त्यामुळे नेम प्लेट बसवण्यापूर्वी काही महत्त्वाच्या बाबी लक्षात ठेवणे आवश्यक आहे...**




- नेम प्लेटवर योग्य प्रकाश असावा : वास्तुशास्त्रानुसार नेम प्लेटच्या वरच्या बाजूस फोकस लाईट लावणे शुभ मानले जाते. विशेषतः पिवळ्या रंगाचा प्रकाश वापरणे अधिक हितावह मानले जाते. हा प्रकाश नेम प्लेटवर समोरून किंवा वरून पडेल, याची काळजी घ्यावी. त्यामुळे नाव स्पष्ट दिसते आणि सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह वाढतो, अशी मान्यता आहे.
- योग्य दिशा आणि स्थान निवडा : नेम प्लेट नेहमी मुख्य प्रवेशद्वाराच्या शुभ स्थानी लावावी. वास्तुशास्त्रानुसार पूर्व दिशा ही अत्यंत शुभ, पवित्र आणि ऊर्जायुक्त मानली जाते. त्यामुळे शक्य असल्यास नेम प्लेट पूर्वेकडील बाजूस बसवावी. यामुळे घरात सकारात्मक परिणाम दिसून येतात, असे मानले जाते.
- नेम प्लेटवर देवतांची चिन्हे टाळा : नेम प्लेटवर कोणत्याही देवतेचे चित्र किंवा चिन्ह कोरणे किंवा छापणे टाळावे. त्याऐवजी स्वस्तिक किंवा ॐ यांसारखी शुभचिन्हे वापरणे अधिक योग्य मानले जाते. मुख्य दरवाजाजवळ ही चिन्हे असल्यास सकारात्मक वातावरण निर्माण होते, अशी श्रद्धा आहे.
- लाकूड किंवा दगडाची नेम प्लेट अधिक शुभ : नेम प्लेट तयार करताना तिच्या साहित्यालाही महत्त्व दिले जाते. वास्तुशास्त्रानुसार लाकूड किंवा दगडापासून बनवलेली नेम प्लेट अधिक शुभ मानली जाते. प्लास्टिकची नेम प्लेट वापरणे टाळावे, कारण त्याचा घरातील वातावरणावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, असे मानले जाते. तसेच नेम प्लेट मुख्य दरवाजाच्या उजव्या बाजूस लावणे योग्य मानले जाते.

### नेम प्लेटवर काय लिहावे?

नेम प्लेटवर शक्यतो घरमालकाचे नाव आणि व्यवसाय एवढीच माहिती लिहावी. नाव सुवर्ण (गोल्डन) रंगात लिहिल्यास ते अधिक शुभ मानले जाते. अशा प्रकारे तयार केलेली नेम प्लेट सकारात्मक ऊर्जेला आमंत्रित करते आणि घरातील वातावरण प्रसन्न ठेवण्यास मदत करते, अशी वास्तुशास्त्रातील मान्यता आहे.

# श्रावणात हिरव्या बांगड्या का घालतात?

**श्रावण महिना हा भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या उपासनेसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्यात हिरव्या रंगाला विशेष महत्त्व असून विवाहित महिलांनी हिरव्या बांगड्या धारण करणे शुभ मानले जाते. धार्मिक परंपरेनुसार यामुळे अखंड सौभाग्य, कौटुंबिक सुख आणि दाम्पत्य जीवनात आनंद टिकून राहतो, अशी श्रद्धा आहे. ज्योतिषतज्ज्ञांच्या मते, श्रावण महिन्यात माता पार्वतीच्या पूजेसह हिरव्या बांगड्या धारण केल्याने सौभाग्य वृद्धिंगत होते आणि पती-पत्नीमधील प्रेम व सुसंवाद कायम राहण्यास मदत होते, अशी धार्मिक मान्यता आहे.**

भारतीय संस्कृतीत बांगड्या या केवळ दागिना नसून विवाहित स्त्रीच्या मंगल, सौभाग्य आणि समृद्धीचे प्रतीक मानल्या जातात. श्रावणात हिरव्या बांगड्या धारण करण्याची परंपरा ही निसर्गातील हिरवाई, स्त्रीशृंगार आणि उत्सवभावनेशी जोडलेली मानली जाते. धार्मिक मान्यतेनुसार, श्रावण महिन्यात भगवान शिवांसोबत माता पार्वतीचीही विशेष पूजा केली जाते. हिरवा रंग माता पार्वतीला प्रिय असल्याचे मानले जाते. त्यामुळे या महिन्यात हिरव्या बांगड्या परिधान केल्यास देवीची कृपा लाभते, अशी श्रद्धा आहे. हिरवा रंग मंगल, शांती आणि शुभत्वाचे प्रतीक मानला जातो. तसेच तो मनाला शांतता देणारा असून तणाव आणि राग कमी करण्यासही सहाय्यक असल्याचे मानले जाते.

### हिरव्या बांगड्या घालताना पाळावयाचे नियम



- श्रावण सुरू झाल्यानंतर सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत आणि श्रद्धेने हिरव्या बांगड्या घालाव्यात.
- बांगड्या धारण करताना भगवान शिव आणि माता पार्वती यांचे स्मरण करून सुखी दाम्पत्य जीवन, कुटुंबाचे कल्याण आणि मंगलासाठी प्रार्थना करावी.
- तुटलेल्या किंवा भेगा पडलेल्या बांगड्या कधीही परिधान करू नयेत.
- श्रावणाशी संबंधित परंपरा आणि विधी प्रदेशानुसार वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे आपल्या कुलाचार आणि कौटुंबिक परंपरेनुसार आचरण करणे अधिक योग्य मानले जाते.

# मुंबई महापालिकेतील उपहारगृहाला तुकाराम मुंढे यांनी ठोकले सील

**मुंबई(प्रतिनिधी)** –मुंबई शहराच्या आरोग्य आणि स्वच्छतेची काळजी करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातच अन्नाच्या सुरक्षेचा आणि स्वच्छतेचा पुरता फज्जा उडाल्याचा प्रकार समोर आला होता. महापालिकेच्या मुख्य इमारतीतील उपहारगृहातील गंभीर अस्वच्छता आणि निकृष्ट अन्नाचा प्रकार उघडकीस आल्यानंतर, अन्न व औषध प्रशासनाचे धडाकेबाज आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली एफडीएच्या पथकाने थेट बीएमसी मुख्यालयातील कॅंटीनवर धाड टाकून ते सील केले आहे.




महापालिका मुख्यालयातील या उपहारगृहातून दररोज शेकडो कर्मचारी आणि नागरिक जेवण-नाश्ता करतात. दररोज सुमारे ७-८ हजार कर्मचारी या उपगारगृहात नाश्ता, जेवण करतात. मात्र, नुकत्याच घडलेल्या प्रकारात एका ग्राहकाला दिलेल्या ताकाच्या ग्लासात चक्क मेलेली माशी आढळून आली. एवढेच नव्हे तर, कांदा भजीच्या ऑर्डरमध्ये भजीच्या आत प्लास्टिकचा धागा तळलेल्या अवस्थेत सापडला. या धक्कादायक प्रकारामुळे पालिकेतील कर्मचारी आणि नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त केला जात होता.

मुंबई महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही काही नगरसेवकांनी या कॅंटीनच्या दर्जाबाबत सवाल उपस्थित केले होते. कॅंटीनमध्ये केवळ अन्नाचा दर्जाच खालावलेला नव्हता, तर तिथे प्रचंड अस्वच्छता पसरल्याचा आरोप करण्यात आला होता. अनेक खाद्यपदार्थ कोणत्याही झाकणाशिवाय उघड्यावर ठेवले जात होते, ज्यावर माश्या आणि डास घिरट्या घालत होते. मुंबई महापालिकेच्या कॅंटीनबाबत प्रश्न उपस्थित झाल्याने खळबळ उडाली.

राज्यात अन्न भेसळ करणारे आणि निकृष्ट दर्जाचे अन्न विकणाऱ्यांवर सध्या आयएएस अधिकारी, एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली धडाकेबाज कारवाया सुरू आहेत. महापालिका मुख्यालयातील कॅंटीनमधील अनागोंदीची गंभीर दखल घेत एफडीएने थेट महापालिकेतच ही मोठी कारवाई केल्याने प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

एफडीएने मुंबई महापालिकेत रात्रीच्या वेळी मुंबई महापालिकेच्या कॅंटीनवर स्ट्राइक केला. एफडीएने धाड मारल्यानंतर कॅंटीनची तपासणी केली. अन्न सुरक्षेच्या सर्व नियमांची पायमल्ली होत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर एफडीएने तात्काळ कठोर पाऊल उचलत कॅंटीनला सील केले.

# झिम्बाब्वेला पराभूत करत टीम इंडियाची मालिकेत आघाडी

**हरारे(वृत्तसंस्था)** –भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील हरारे येथील पहिला टी २० सामना भारतानं जिंकला आहे. या मॅचमध्ये झिम्बाब्वेनं प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १२५ धावा केल्या. भारतानं हे आव्हान १४ व्या ओव्हरमध्ये ३ विकेट गमावत पार केलं. वैभव सूर्यवंशीचं अर्धशतक, इशान किशन आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांच्या फलंदाजीच्या जोरावर भारतानं हे आव्हान सहजपणे पार केलं.

झिम्बाब्वेनं दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा अपयशी ठरला. मुझरबानी यानं अभिषेक शर्माला १ रनवर बाद केलं. टीम इंडियाचा बेबी बॉस अशी ओळख मिळालेल्या वैभव सूर्यवंशीनं झिम्बाब्वे विरोधात १८ बॉल ५० धावा केल्या. अर्धशतक झाल्यानंतर वैभव सूर्यवंशी लगेचच बाद झाला. वैभवनं अर्धशतकी खेळीमध्ये ४ षटकार आणि ४ चौकार मारले. अर्धशतक केल्यानंतर वैभव सूर्यवंशी रिचर्ज नगरावा याच्या गोलंदाजीवर बाद झाला. ईशान किशन यानं ३५ धावा केल्या तर श्रेयस अय्यर यानं नाबाद २८ धावा केल्या. तर तिलक वर्मानं ६ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यर




याच्या नेतृत्वात भारताचा हा पहिला विजय ठरला. यापूर्वी आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यात भारताचा पराभव झाला होता. आजच्या टी २० सामन्यातील विजयासह भारत पुन्हा विजयाच्या ट्रॅकवर परतला आहे.

भारताचा कर्णधार श्रेयस अय्यर यानं टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. झिम्बाब्वेनं प्रथम फलंदाजी करताना ७ बाद १२५ धावा केल्या आहेत. युवा गोलंदाज मयंक यादव यानं पहिल्याच बॉलवर झिम्बाब्वेला धक्का दिला. मयंक यादव, अशोक शर्मा, प्रिन्स यादव या तिघांच्या माऱ्यासमोर झिम्बाब्वेचे फलंदाज टिकू शकले नाहीत.

मयंक यादवनं पहिल्याच बॉलवर ब्रायन बेनेट याला बाद केलं. टी २० मॅचमध्ये पहिल्याच बॉलवर विकेट घेणारा मयंक यादव हा भारताचा चौथा फलंदाज ठरला आहे. भुवनेश्वर कुमार, हार्दिक पांड्या या दोघांनी तीन तीन वेळा अशी कामगिरी केली आहे. अर्शदीप सिंग यानं दोन वेळा पहिल्या बॉलवर विकेट घेतली आहे.

भारताचा वेगवान गोलंदाज अशोक शर्मा यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं आहे. आजच्या मॅचमध्ये अशोक शर्माला एकही विकेट मिळाली नाही. मात्र, त्यानं ४ ओव्हरमध्ये २९ धावा दिल्या. झिम्बाब्वेचा निम्मा संघ ६४ धावांवर बाद झाला. वेसली मधेवेरे आणि तादिवानाशे मारुमानी यांच्यातील ५७ धावांच्या भागीदारीमुळं झिम्बाब्वेला १०० धावांचा टप्पा पार करता आला.

# दक्षिण गुजरातमध्ये पावसाचं तांडव; वलसाड-वापी जलमय

**गांधीनगर(वृत्तसंस्था)**– दक्षिण गुजरातमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार आणि मुसळधार पावसाने अत्यंत भीषण रूप धारण केले आहे. वलसाड, नवसारी, सूरत, वापी आणि डांग या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक भागांत मुसळधार पाणी साचले असून सखल भागात पुराचा मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः वलसाड आणि वापी परिसरातून समोर आलेली दृश्ये परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट करत आहेत. अनेक सोसायट्या, रस्ते आणि घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिक मोठ्या संकटात सापडले आहेत.

सतत सुरू असलेल्या पावसामुळे वलसाड जिल्ह्यातील अनेक सखल भाग पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. काही ठिकाणी तर इमारतींचे तळमजले पाण्याखाली गेल्याने नागरिक घरातच अडकून पडले आहेत. प्रशासनाने तात्काळ पावले उचलत मदत आणि बचाव पथकांना पाचारण केले आहे. एनडीआरएफच्या पथकांनी रशीच्या मदतीने अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी मोठे अभियान राबवले आहे.

दुसरीकडे, वापी येथील 'आवध बंगला' सोसायटीत परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. या सोसायटीचे तळमजले पूर्णपणे बुडाले असून पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या अनेक आलिशान कार पाण्याखाली गेल्या आहेत.

# केंद्र सरकार 'सार्वजनिक परीक्षा कायदा, २०२४' अंतर्गत कारवाई अधिक तीव्र करण्याच्या तयारीत

**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**–नीट परीक्षा पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकार 'सार्वजनिक परीक्षा (अयोग्य मार्गांचा प्रतिबंध) कायदा, २०२४' अंतर्गत कारवाई अधिक तीव्र करण्याच्या तयारीत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींवरील खटल्यांची दररोज सुनावणी घेण्यासाठी चार राज्यांमध्ये 'फास्ट-ट्रॅक' न्यायालये स्थापन केली जातील.

नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर दिल्लीसह संपूर्ण देशात तरुणांचे आंदोलन सुरू झाले आहे. अनेक ठिकाणी आंदोलनाला हिंसक वळण लागलं आहे. महाराष्ट्रात तर या हिंसेच्या विरोधात आणि केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यासाठी बंदची हाक देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करून नीट प्रकरणासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करणार असल्याचा मोठा निर्णय जाहीर केला आहे. मोदींचा हा निर्णय येताच यंत्रणा कामाला लागली आहे. चार राज्यात फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

## Change In Name

**My Old Name is RANJANABAI BAPURAO KAVOTHEKAR which now I am Changing as New Name RANJANA MANOHAR PATIL. Hence forth my all correspondence will be done as per my New Name. Please consider the same.**

**Address- House No/ 14 Matha Galli at post Kasrali, Taluka Biloli District Nanded 431710**
**Mob. No. 9503216439**
**9766075681**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार करतारसिंघ पि. चरणसिंघ रामगडीया रा. बंदाघाट रोड, वजिराबाद, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सदरील जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

हे की, माझे पक्षकारांचे वडील चरणसिंघ पि. हुजुरसिंघ रामगडीया रा. बंदाघाट रोड, वजिराबाद रोड नांदेड हे सर्वे क्र.१३, २१ व २३ स्थित वजिराबाद नांदेडचे मालक व ताबेदार होते. सदरील जमिनी ह्या माझ्या पक्षकारांच्या वडीलोपार्जीत जमिनी आहेत आणि त्या जमिनी चरणसिंघ हुजुरसिंघ रामगडीया यांना वारसाने मिळालेल्या होत्या. चरणसिंघ यांच्या मृत्युनंतर माझे पक्षकार व इतर त्यांचे कायदेशीर वारस या नात्याने वर नमूद जमिनीचे वारसाने मालक व ताबेदार झाले.

हे की, दि. १२.०७.२०२६ रोजी मंगतराम पि.जोगींदरलाल घई रा. दिलीपसिंह कॉलनी, नांदेड हे काही व्यक्ती सोबत सर्वे नं. १३ मधील माझ्या ताब्यातील मोकळ्या जागेमध्ये आले. त्यावेळेस ते या जमिनीमध्ये का आले असे विचारले असता मंगतराम यांनी सांगीतले की, त्यांनी येथे प्लॉट घेतलेला आहे आणि तो प्लॉट ते विक्री करण्यासाठी ग्राहकांना ती जागा दाखवित आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माझे पक्षकारांच्या वडिलांनी मंगतराम यांच्या हक्कात या जागेबाबत विक्रीखत केले आहे, म्हणून ते सदरील जागा विकत आहेत. त्यावर माझ्या पक्षकारांनी सदरील जागा त्यांच्या मालकी व ताब्याची असल्याचे सांगितल्यावर ते निघून गेले.

हे की, माझ्या पक्षकारांचे वडील चरणसिंघ हुजुरसिंघ रामगडीया यांनी सर्व्हे नं.१३ मधील कोणतीही जागा मंगतराम जोगींदरलाल घई यांना विक्री केलेली नाही. तसेच या सर्व्हेचा एन.ए. लेआऊट झालेला नाही. सदरील जागा वडीलोपार्जीत असल्यामुळे चरणसिंघ यांना ती जागा विक्री करण्याचे अधिकार नव्हते आणि माझ्या पक्षकारांच्या वडीलांना सदरील प्लॉट विक्री करण्याची कोणतीही कायदेशिर गरज नव्हती. माझ्या पक्षकाराच्या माहितीप्रमाणे त्यांच्या वडीलांनी सर्वे क्रं. १३ मधील कोणतीही जागा मंगतराम जोगींदरलाल घई यांना विक्री केलेली नाही. तरी सर्व जनतेस सदरील जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी सर्वे क्र. १३ स्थित वजिराबाद नांदेडमधील जागेचे मंगतराम पि. जोगींदरलाल घई यांच्यासोबत कोणताही खरेदी-विक्रीचा व्यवहार करू नये. अशा प्रकारचा व्यवहार झाला असल्यास तो माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. सबब जाहीर प्रगटन.

| | |
|---|---|
| मार्फत | प्रगटन देणार |
| अ‍ॅड. एम. एस. युसूफजई | करतारसिंघ पि. चरणसिंघ रामगडिया |
| नांदेड | रा. बंदाघाट रोड, वजिराबाद, नांदेड |
| मो. ९८२३१८०४८६ | मो. ९८९००२३२५५ |

# प्रेस रिपोर्टर वधू; पार्थ पवार यांचा २७ फेब्रुवारी रोजी बारामतीत विवाह



**मुंबई(प्रतिनिधी)**–राष्ट्रवादीचे राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांनी कायनात दारा यांच्याशी लग्न करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. खासदार पार्थ पवार यांचा विवाह २७ फेब्रुवारी २०२७ रोजी बारामती येथे संपन्न होणार आहे. त्यापूर्वी जुलै २०२६ या महिन्याच्या २९ तारखेला अत्यंत साध्या आणि कौटुंबिक वातावरणात, मोजक्या नातेवाईकांच्या व फक्त निमंत्रित यांच्या उपस्थितीत साखरपुडा समारंभ पार पडणार आहे.

तसेच, पार्थ पवार यांच्या होणाऱ्या वधूचे नाव कायनात दारा असून त्या मूळच्या चंदीगड येथील आहेत व सध्या दिल्ली येथे वास्तव्यास आहेत. मागील काही दिवसांपासून माध्यमांमध्ये त्यांचे जन्म ठिकाण तसेच नावाच्या संदर्भात चुकीची, त्रुटीपूर्ण आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आल्याने पार्थ पवार यांच्याकडून कायनात यांच्याबद्दल माहिती देण्यात आली आहे.

कायनात दारा या काश्मिरी असल्याचा उल्लेख अनेक माध्यमांनी केला आहे. मात्र त्या काश्मिरी नसून त्या पंजाबी आहेत. द ब्रिटीश स्कूल चाणक्यनगरी दिल्ली येथून त्यांनी शिक्षण पूर्ण केले आहे. राजधानी दिल्लीतील अत्यंत प्रतिष्ठित आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षणसंस्थांपैकी ही एक संस्था मानली जात आहे. द लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून त्यांनी आपले उच्च शिक्षण पूर्ण केले आहे.

उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भारतातील अग्रगण्य इंग्रजी वृत्तवाहिन्यांपैकी एक असलेल्या NDTV या संस्थेत आऊटपूट एडिटर आणि रिपोर्टर म्हणून कार्य केले.

# नवी दिल्लीतील 'मऱ्हाटी एम्पोरियम'चा कायापालट करणार –उद्योगमंत्री उदय सामंत

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)**–नवी दिल्ली येथील महाराष्ट्राच्या मऱ्हाटी एम्पोरियमचा सर्वसमावेशक विकास करून तेथे महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती व परंपरेचे प्रतिबिंब टिपणारे भव्य व आकर्षक दालन उभारण्याचा निर्णय राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी घेतला.

उद्योगमंत्री श्री सामंत यांनी आज नवी दिल्लीतील महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लिमिटेडच्या अखत्यारीत असलेल्या मऱ्हाटी एम्पोरियमला सदिच्छा भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि अधिकाऱ्यांसोबत सविस्तर आढावा बैठक घेतली.

यावेळी मार्गदर्शन करतांना उद्योगमंत्री श्री सामंत म्हणाले,नवी दिल्ली हे देशाचे केंद्रस्थान असून येथे जगभरातून पर्यटक आणि उद्योजक येतात. आपल्या महाराष्ट्रातील ग्रामीण कारागीर, महिला बचत गट आणि स्थानिक उद्योजकांच्या हाताला काम मिळून त्यांच्या कलागुणांना 'ग्लोबल प्लॅटफॉर्म' मिळणे आवश्यक आहे. या नूतनीकरणामुळे महाराष्ट्राची उत्पादने दिल्लीच्या मुख्य बाजारपेठेत आपले वेगळे स्थान निर्माण



करतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

एम्पोरियमची पुनर्रचना करताना ते केवळ विक्री केंद्र न राहता, महाराष्ट्राच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडवणारे 'अनुभूती केंद्र' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करावा. तसेच या दालनाच्या माध्यमातून जगप्रसिद्ध पैठणी व हातमाग, कोल्हापुरी चप्पल, वारली पेंटिंग्स, हस्तकलेच्या वस्तू आणि महाराष्ट्राचे स्थानिक खाद्यपदार्थ (गृहउद्योग) एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचे नियोजन करावे असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

सामंत यांनी दिल्लीतील काश्मीर, गुजरात बिहार या एम्पोरियम्सना भेट देऊन डिझाइन आणि विपणन पद्धतींबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लिमिटेडचे महाव्यवस्थापक संगीता वराडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे,कंपनी सेक्रेटरी अक्षय पाठक यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**श्री पी. डी. झांबरे साहेब, तदर्थ जिल्हा न्यायाधीश ३ व अति सत्र न्यायाधीश औरंगाबाद यांचे न्यायालयात**

नियमित दिवाणी अपील क्र. ४८/२०२५
निशाणी क्र. १४

राजेंद्र किसनराव गुप्ते
विरुद्ध
कावेरी दिगंबर राठोड व ई.

प्रति,

२.१ संदीप पि. दिगंबर राठोड, वय ३५, व्यवसाय शेती रा. दाबका राजा, ता. मुखेड जि. नांदेड. पिन ४३१७१६, २.२ अंजली भ्र. पृथ्वीराज चव्हाण, वय ३९ धंदा घरकाम, रा. द्वारा कावेरी भ्र. दिगंबर राठोड, दाबका राजा ता. मुखेड जि. नांदेड

ज्या अर्थी अपीलकर्त्याने सोबतच्या नकलीप्रमाणे तुमच्या विरुद्ध नियमित दिवाणी अपील क्र. ४८/२०२५ दाखल केली आहे आणि ज्या अर्थी तुम्हाला बजावण्यात आलेली नोटीस समज प्रक्रियेद्वारे बजावता येत नाही, कारण तुम्ही नोटीस स्वीकारणे टाळत आहात, किंवा तुमची राहण्याची जागा अज्ञात आहे.

त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या आदेश पाच नियम २०,१ अ अन्वये मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशावरून तुम्हाला या जाहीर नोटीस द्वारे आदेशित करण्यात येते की तुम्ही दिनांक १३/०८/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात स्वतः किंवा नियुक्त वकीला मार्फत हजर राहावे.

तुम्ही हजर न राहिल्यास सदर अपील तुमच्या अनुपस्थितीत एकतर्फी चालवण्यात येईल आणि योग्य ते आदेश पारित करण्यात येतील.

सदर नोटीस दिनांक १५/०७/२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली.

पुढील तारीख १३/०८/२०२६

आदेशाद्वारे

**अधीक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय छत्रपती संभाजीनगर**

## Change In Name

**My Old Name is SAYYED AHEFAZ SYED FAYYAZ which now I am Changing as New Name SAYYAD AIFAZ SAYYAD FAYYAZ Hence forth my all correspondence will be done as per my New Name. Please consider the same.**

**Address**
**Add:H.no H.NO.1487/1/1 EKTANAGAR, GOKUNDA,NANDED 431604.**
**Cell No: 9766539564**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार नामे दत्ता पि. किशनराव जाधव रा. जवळगाव ता. हिमायतनगर जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी सौ. अनिता भ्र. लक्ष्मण देवडे रा. अभिजीत सोसायटी नांदेड ता. जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील एक घर जे की, अभिजीत सहकारी गृहनिर्माण संस्था लि. नांदेड बी. अ‍ॅन्ड सी. कॉलनी, चैतन्य नगरच्या समोर तरोडा (बु.) नांदेड ता. जि. नांदेड येथील शेत गट क्र. २१७ मधील सोसायटी सदस्य क्र. ८१ असून, ज्याचा प्लॉट नं. ५/ब आहे जे लिहून देणार यांच्या नावे सोसायटीमध्ये शेअर्स सर्टिफिकेट अनु. क्र. १९१ वर प्लॉट अलॉटमेंट सर्टिफिकेट अनु. क्र. १८४ वर लिहुन देणार यांचे नावे आहे. सदरील प्लॉटवर ३ रुमचे पक्के घर, संडास, बाथरूम व समोर मोकळी जागा, अंगण असून, सदरील घराची रुंदी १६.५ फुट व लांबी ५० फुट, एकूण क्षेत्रफळ ८२५ चौ. फुटाचे आहे. सदरील घराची चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहे.

पूर्वेस : ३० फुट रुंदीचा रोड आहे, पश्चिमेसः माशनवार यांचे घर आहे, दक्षिणेस-: प्लॉट नं. ५/ए- जाधव सर यांचे घर आहे. उत्तरेस-डॉ. शिवाजी धुमाळे यांचे घर आहे. उत्तरेस : डॉ. शिवाजी धुमाळे यांचे घर आहे.

वरील चतु:सिमेच्या आतील घर हे माझे पक्षकार यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा करार केलेला असून करारापोटी बयाना म्हणून काही रक्कमसुद्धा दिली आहे. उर्वरित रक्कम देऊन लवकरात लवकर खरेदीखत करण्याचे ठरले आहे.

तरी वरील व्यवहारास कोणास काही आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास त्यांनी लेखी कागदपत्रासह खालील दिलेल्या पत्त्यावर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यावर ७ दिवसांच्या आत आपला आक्षेप लेखी कागदपत्रासह नोंदवावा. दिलेल्या मुदतीत आक्षेप नाही आल्यास माझे पक्षकार नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील. नंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी, करिता हे जाहीर प्रगटन.

| | |
|---|---|
| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
| अ‍ॅड. माने डी. आर. | दत्ता पि. किशनराव जाधव |
| अ‍ॅड. शुभांगी जे. वडजे | रा. जवळगांव, ता. हिमायतनगर जि. नांदेड |
| मो. नं. ९८५०७६३७७३ | |


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहिरात(तिसरी वेळ)

**जा. क्र. नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/४६५१/२०२६** **दिनांक-२३ जुलै २०२६**

'प्रधानमंत्री आवास योजना(पीएमएवाय)' अंतर्गत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी शहर स्तरीय तांत्रिक कक्षातील (सीएलटीसी) तज्ञांची एकत्रित वेतनावर/कंत्राटी तत्त्वावर पदे भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवारांकडून खालील वेळापत्रकानुसार अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरील पदाची खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतिसह नियोजित दिनांकास परिपूर्ण अर्ज सादर करावा.

| वेळापत्रक | |
|---|---|
| कंत्राटी तत्त्वावरील पदाचे नाव | दिनांक व वेळ व स्थळ |
| Town Planning Specialist-01 | अर्ज स्वीकारण्याची मुदत, दिनांक २४/७/२०२६ ते ४/८/२०२६ पर्यंत<br>**वेळ**-सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येतील.<br>**अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण**-प्रधानमंत्री आवास योजना विभाग पहिला माळा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड<br>**मुलाखत दिनांक**-मनपा संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.<br>**स्थळ आणि ठिकाण**-मनपा संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

| अ. क्र. | पदाचे नाव (कंत्राटी पद्धतीने) | योजनेचे नाव | पदसंख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव, वयोमर्यादा | वयोमर्यादा | एकत्रित वेतन (प्रतिमहा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Town Planning Specialist | PMAY | 01 | 1. Post Graduate or Graduate Degree in Urban Planning or Regional Planning or Geography<br>2. Minimum of 3-5 Years of work Experience Urban Planning With Experience of Urban Infrastructure Projects/Affordable Housing/ Slum Development Project.(for Post Graduate Candidate 5 Year Experience & Graduate Candidate 3 Year Experience)<br>3. Experience of Reform Oriented Projects in Desirable<br>4. Fluency in Local Language Desirable. | 18 to 38 (Backward Class Candidates Will Get a Relaxation of 5 Years) | (Rs 60,000 For Post Graduate & Rs 50,000 For Graduate) |

वरील पदासाठीचा सविस्तर तपशील अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता व अटी व शर्ती व मनपाकेच्या नोटीस बोर्डावर www.nwcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

**अतिरिक्त आयुक्त**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## ‘वंचित’च्या बंदला नवीन नांदेडमध्ये प्रतिसाद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नीट पेपर फुटीप्रकरणी आंदोलनास बसलेल्या विद्यार्थी आंदोलकांवर २० जुलै रोजी दिल्लीत झालेल्या लाठी हल्ल्याप्रकरणी निषेध म्हणून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवार, दि. २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंद पुकारला होता. या बंदला राष्ट्रवादी शरद पवार गट, ऊबाठा शिवसेना, काँग्रेस आय व संभाजी बिग्रेड, भीमकायदा सामाजिक संघटना यांसह विविध संघटनांनी पाठिंबा दर्शविला. या बंदमध्ये नवीन नांदेड भागातील सिडको-हडको येथील व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने बंद ठेवून पाठिंबा दर्शविला.

वंचितने पुकारलेल्या या बंदला सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी पाठिंबा जाहीर करून बंद यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला. या बंदला नवीन नांदेड मधील सिडको-हडको भागातील विविध व्यापारी प्रतिष्ठाने, शाळा, महाविद्यालये व बाजारपेठ बंद ठेवून हा बंद यशस्वी केला.

गुरुवारी आंदोलकांनी हडको ते सिडको, माता रमाई आंबेडकर चौक, संभाजी चौक मार्ग जुने वसंतराव नाईक महाविद्यालय येथे पदयात्रा काढून बंदचे आवाहन केले. आंदोलकांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे बंद यशस्वी केला. बंद काळात नवीन नांदेड भागात अनुचित प्रकार घडू नये म्हणून सावधगिरी बाळगत ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी २३ जुलै रोजी केंद्रशासनाच्या निषेधार्थ बंदचे आवाहन केले होते. वंचित बहुजन आघाडीच्यावतीने करण्यात आलेल्या आवाहनाला समर्थन देत गुरुवारी हडको भागातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या आंदोलनाला हडको, ज्ञानेश्वर नगर, अण्णाभाऊ साठे पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांती चौक, राज कॉर्नर, माता रमाई चौक, संभाजी चौक, वसंतराव नाईक महाविद्यालय दरम्यान पदयात्रा काढण्यात आली. आंदोलकांनी पंतप्रधान, गृहमंत्री व शिक्षणमंत्री यांचा निषेध व्यक्त करून हुकुमशाही नहीं चलेगी यासह अनेक घोषणा दिल्या. या आंदोलनात काँग्रेस आयचे सिडको ब्लॉक अध्यक्ष बापुसाहेब पाटील, विनोद कांचनगिरे, देविदास कदम, पक्ष प्रवक्ते प्रसेनजित वाघमारे, ज्योती कदम, सोपान पांडे, संभाजी बिग्रेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, शिवाजी हंबर्डे, भीम कायदा सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास गजभारे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे दक्षिण विधानसभा प्रमुख विठ्ठल गायकवाड, अशोक मगरे, विनायक गजभारे, अक्षय भालेराव, गोपाल सिंग टाक, राघोजी वाघमारे, बालाजी ढवळे, दीपक भरकड, प्रदीप हनुमंते, सम्राट आढाव, राघोजी वाघमारे, शंकर महाजन, गौतम डुमणे, साहेबराव भंडारे, अमृत नरंगलकर, रवी पंडित, विजय भंडारे, जयपाल ढवळे, के. के. कांबळे, नामदेव पांचाळ, सुरेश पोवळे यांच्यासह जेष्ठ नागरिक, युवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अवैध धंद्यांवर धडक; ७९ आरोपींवर कारवाई, दारू- जुगार अड्डे उद्ध्वस्त

### एसपी डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने जिल्हाभर छापे

**नांदेड (प्रतिनिधी)–** अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलिसांनी जिल्हाभर मासरेड विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत एकाच दिवसात ५६ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७९ आरोपींवर कायदेशीर कारवाई करून ८ लाख ७७ हजार २४० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या विशेष मोहिमेत शहरी व ग्रामीण भागातील संशयित ठिकाणांवर सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने एकाच वेळी अचानक छापे टाकले. कारवाईदरम्यान विविध ठिकाणांहून अवैध दारूसाठा, जुगार साहित्य, मटका साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली.

संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा व इतर लागू कायद्यांनुसार गुन्हे नोंदविण्यात आले.



कारवाईत अवैध दारू ४५ गुन्हे दाखल, ४७ आरोपींवर कारवाई, ६ लाख २३ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त, जुगार/मटका प्रकरणात ११ गुन्हे दाखल, ३२ आरोपींवर कारवाई, २ लाख ५३ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मोहिमेद्वारे अवैध धंदे करणाऱ्यांवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही नियमितपणे सुरू राहतील, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक, नांदेड व भोकर, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

जिल्ह्यातील ज्या भागात अवैध दारू, जुगार, मटका, अंमली पदार्थ किंवा इतर बेकायदेशीर प्रकार सुरू असल्यास त्याची तत्काळ माहिती स्थानिक पोलीस ठाणे किंवा पोलीस नियंत्रण कक्षाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मनपात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त दि.२३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये त्यांच्या प्रतिमेस महापौर कविता मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

लोकमान्य टिळकांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात अतुलनीय योगदान दिले. टिळकांनी केसरी आणि मराठा या वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेमध्ये राष्ट्रभक्तीची चेतना जागवली. सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला संघटित करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यांचे विचार आजच्या पिढीसाठीही तितकेच प्रेरणादायी आहेत.

याप्रसंगी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, उपायुक्त गंगाधर ईरलोड, उपायुक्त नितीन गाढवे, मुख्य लेखापरीक्षक आनंद ऐनवाड, शिक्षणधिकारी प्रविणा मांदळे यांच्यासह नगरसेवक, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## लोहा बंद दरम्यान आषाढी वारीच्या भाविकांसाठी अन्नदान

**लोहा (प्रतिनिधी)–** दिल्ली येथे विद्यार्थ्यांवरील लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ गुरुवारी लोहा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. या बंदला व्यापारी, व्यावसायिक व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या व्यवसायासह सर्व व्यवहार बंद ठेवून निषेध नोंदविला.

बंदच्या पार्श्वभूमीवरही मानवतेचा संदेश देत लोहा शहरातील व्यापाऱ्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. श्री आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी लोहा



बसस्थानक येथे मोफत अल्पभोजन (खिचडी) तसेच स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

बसस्थानक परिसरात सकाळपासूनच वारकरी, प्रवासी, महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांची मोठी गर्दी होती. स्वयंसेवकांनी अत्यंत आपुलकीने प्रत्येक भाविकाला खिचडी वाढून सेवा केली. अनेक भाविकांनी भोजनाचा आस्वाद घेत आयोजकांचे मनापासून आभार मानले.

या सेवाभावी उपक्रमाचे आयोजन उद्योजक भारत तेल्लरवार, युवा उद्योजक राहुल बिडवई, गिरीश तेल्लरवार, प्रमोद पारेकर, नगरसेवक शंकर वट्टमवार, सामाजिक कार्यकर्ते दत्ता शेटे, माजी नगरसेवक अनिल दाढेल, पिंटू चौकले, लतिफ मामू, सुदन वट्टमवार, बालाजी तेल्लरवार, राजेश कोटलवार, भूषण दमकोंडवार, दयानंद मल्लूरवार, वसंत उत्तरवार, विपीन पेनूरकर, धनंजय संगवे, मनोज महाजन, अथर्व खपले, पत्रकार विलास सावळे, छायाचित्रकार विनोद महाबळे, गजानन दांगटे तसेच समर्थ ड्रेसेस बिडवई यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

### नांदासौख्यभरे

**पडोळे-भोसले**

सौ. पूजा व प्रतापराव दत्तराव पडोळे रा. जडगाव, ता. औंढा (ना.) जि. हिंगोली यांची ज्येष्ठ कन्या चि. सौ.कां. संग्राली हिचा शुभविवाह सौ. संगिता व नेताजीराव व्यंकटराव भोसले रा. थुगाव, ता. जि. नांदेड यांचे ज्येष्ठ चिरंजीव राज यांचेसमवेत आज शुक्रवार, दि. २४ जुलै, २०२६ रोजी सकाळी ११.४६ वा. तिरूमला लॉन्स, अकोला बायपास रोड, हिंगोली येथे सानंद संपन्न होत आहे.

वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

**-मुख्यसंपादक**

## जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांना मारहाणप्रकरणी जिल्ह्यात ठिकठिकाणी बंद













**नांदेड (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटी प्रकरणी पुकारण्यात आलेल्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ पुकारलेल्या बंदला जिल्हाभरातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. हा बंद यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील बहुतांश ठिकाणी वंचितच्या कार्यकर्त्यांसह सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.

**किनवटमध्ये बंदला प्रतिसाद**

**किनवट (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र बंदला किनवटमध्येही चांगला प्रतिसाद मिळाला. या बंदमध्ये सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी सहभाग घेऊन शहरातील प्रतिष्ठाने शांततेच्या मार्गाने बंद करण्याचे आवाहन केले.

किनवटसह गोकुंदा परिसरातील अनेक व्यापारी प्रतिष्ठाने बंद ठेवण्यात आली होती. वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष निखिल वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने सहायक जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.

शांततेच्या मार्गाने आंदोलन करणे हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार असून, विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे लोकशाही मूल्यांच्या विरोधात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. बंदमध्ये वंचित बहुजन आघाडीसह इतरही विरोधी पक्षांनी सक्रिय सहभाग घेऊन निषेध रॅली काढली. अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली शहरासह संवेदनशील भागात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**तामसा बाजारपेठ कडकडीत बंद**

**तामसा (प्रतिनिधी)–** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या ‘महाराष्ट्र बंद’च्या हाकेला तामसा शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या बंद काळात व्यापाऱ्यांनी आपली दुकाने व आस्थापना पूर्णपणे बंद ठेवून या आंदोलनाला आपला पाठिंबा जाहीर केला.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, गुरुवारी वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी तामसा पोलीस ठाण्यात रीतसर निवेदन सादर केले. गुरुवार, दि. २३ जुलै रोजी आयोजित ‘महाराष्ट्र बंद’मध्ये तामसा शहरातील सर्व व्यापारी, दुकानदार व नागरिकांनी सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला शहरातील व्यापाऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

तामसा मार्केट असोसिएशनच्या अध्यक्षांची वंचितच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांना बंदमध्ये सहभागी होण्याची एका निवेदनाद्वारे विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन तामसा मार्केट असोसिएशनने या बंदमध्ये सहभाग घेतला.

सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत गुरुवारी तामसा मुख्य बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने पूर्णतः बंद ठेवली. सकाळपासूनच मुख्य बाजारपेठेत शंभर टक्के शुकशुकाट पाहायला मिळाला. भाजीपाला, कापड दुकान, किराणा आणि इतर सर्व व्यापारी आस्थापना बंद ठेवण्यात आल्याने संपूर्ण बाजारपेठ कडकडीत बंद पाळण्यात आल्याचे चित्र दिसून आले.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते जयकिन रावळे, डॉ. शिंदे उमरीकर, शाहरुख पठाण, मुस्ताक कुरेशी, सलमान शहा, अमोल रावळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. बंद दरम्यान तामसा पोलीस स्टेशनचे अधिकारी सहदेव खेडकर व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त लावला होता. यामुळे बंद शांततेत पार पडला.

**व्यापाऱ्यांच्या प्रतिसादामुळे बरबडा बाजारपेठ बंद**

**बरबडा (प्रतिनिधी)–** दिल्ली येथील जंतर मंतर मैदानावर विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला नायगाव तालुक्यातील बरबडा येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गुरुवार, दि. २३ जुलै रोजी बरबडा येथील व्यापाऱ्यांनी आपले व्यापार व व्यावसायिक आस्थापना स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून या बंदला पाठिंबा दिला. विशेष म्हणजे गुरुवार, दि. २३ जुलै रोजी गावातील लहान -मोठ्या व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार पूर्णपणे बंद ठेवले होते.

बरबडा येथील बसवेश्वर मुख्य चौकात आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत जंतर-मंतर मैदानावरील विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा निषेध व्यक्त केला. या बंदमध्ये नायगाव तालुक्यातील बरबडा, कुंटूर, आंतरगाव, मनूर, पाटोदा येथील बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी शांततेच्या मार्गाने आंदोलन केले.

बंद यशस्वी करण्यासाठी अंकुश हनमंते, सतीश हनमंते, किरण हनमंते, गौतम एडके, शंकर कोंपलवाड, प्रल्हाद जेटेवाड, देविदास जेटेवाड यांनी विशेष सहभाग नोंदवला.

**मुदखेड उत्स्फूर्तपणे बंद**

**मुदखेड (प्रतिनिधी)–** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ‘महाराष्ट्र बंद’ ची घोषणा केली. या घोषणेला मुदखेड शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

दि.२३ जुलै २०२६ रोजी मुदखेड शहरातील व्यापाऱ्यांनी आपापले व्यवहार पूर्णपणे बंद ठेवून जंतर-मंतरवरील घटनेचा निषेध नोंदवला आहे. मुदखेड तालुका शिवसेना (उबाठा), मुदखेड काँग्रेस कमिटी, वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टीच्या पुढाकाराने आणि सर्वपक्षीय नेत्यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करत तहसील कार्यालय येथे कारवाईच्या मागणीचे निवेदन देण्यात आले.

भावी पिढीच्या भविष्यासाठी आणि न्यायासाठी लढणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला करणे म्हणजे लोकशाहीचा गळा आवळण्यासारखे आहे. केंद्र शासनाचा हा हुकूमशाही कारभार खपवून घेतला जाणार नाही, असा तीव्र संताप याप्रसंगी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला. या निषेध आंदोलनात शहरात दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला असून, कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुदखेड ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**नायगाव, नरसीतही बंदला प्रतिसाद**

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** गुरुवारी नायगाव व नरसी शहरात महाराष्ट्र बंदच्या हाकेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या बंद काळात व्यापारी, व्यावसायिक व विविध घटकांनी स्वयंस्फूर्तीने आस्थापना बंद ठेवत आंदोलनाला पाठिंबा दिला. विशेष म्हणजे गुरुवारी नायगावचा आठवडी बाजार असूनही संपूर्ण बाजारपेठ कडकडीत बंद राहिल्याने दिवसभर शुकशुकाट पाहायला मिळाला.

नायगाव येथील हेडगेवार चौकात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत जोरदार घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा निषेध करत पेपरफुटीला जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, संबंधित अधिकाऱ्यांना अटक करावी तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

नायगाव, नरसीसह तालुक्यातील विविध गावांतील कार्यकर्त्यांनी बंदमध्ये सहभाग घेतल्याने आंदोलनाला व्यापक प्रतिसाद मिळाला.

या आंदोलनात साईनाथ जिगळेकर, रंजीत देशमुख नरंगलकर, विठ्ठल गवळी, सचिन भेदे, शाम गायकवाड, टिपू इरफान, बालाजी गायकवाड, विलास नरसीकर, किरण भेदे, साहेबराव कोपरेकर, अरुण भेदे, शुभम भेदे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक सहभागी झाले होते.

बंदच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी नायगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भगत व रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनी विक्रम हराळे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे संपूर्ण बंद शांततेत पार पडला.

**अर्धापूर बंदला संमिश्र प्रतिसाद**

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र बंदला अर्धापूर शहरात संमिश्र प्रतिसाद मिळाला. व्यापाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे आपली दुकाने बंद ठेवली. आंदोलकांनी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे निवेदन तहसीलदारांमार्फत सादर केले. या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com